रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३५५
www.ramprahar.com

◆ सोमवार, १३ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

आषाढीसाठी ५,५०० विशेष एसटी बसेस/२

एनएमएमटीच्या ताफ्यात ५१ सीएनजी बसेस/६

स्वित्झर्लंडचा धुव्वा उडवत अर्जेंटिना सेमीफायनलमध्ये/८

### व्हिएतनाम बोट दुर्घटनेप्रकरणी कॅप्टन पोलिसांच्या ताब्यात



**होनई :** व्हिएतनाममध्ये शनिवारी स्पीडबोट उलटून झालेल्या दुर्घटनेत १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेत २३ जणांची सुटका करण्यात आली. याप्रकरणी आता स्पीडबोटच्या कॅप्टनला पोलिसांनी ताब्यात घेतले असून जलवाहतूक सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाले का याची चौकशी पोलीस करीत आहेत. स्पीडबोट कॅप्टनची गुयेन होंग हाई (५७) अशी ओळख पटली आहे. ही स्पीडबोट शनिवारी दुपारी किनाऱ्यापासून अर्धा किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर उलटली. 'फू क्वोक'जवळ ही दुर्घटना घडली. दुर्घटनेतून वाचलेल्या १६ जणांना डिस्चार्ज देण्यात आला असून ते मायदेशी परतत आहेत, मात्र दुर्घटनेतून वाचलेल्यांपैकी एकाची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर व्हिएतनाममधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# महाराष्ट्र रेल्वे फाटकमुक्त करणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा | येत्या तीन वर्षांत १४५ रेल्वे उड्डाणपुलांचे बांधकाम

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील नागरिकांना सुरक्षित व तंत्रज्ञानाधारित दळणवळण सुविधा उपलब्ध करून देतानाच रेल्वे फाटकाअभावी होणारे अपघात टाळण्यासाठी येत्या तीन वर्षांत १४५ रेल्वे उड्डाणपुलाच्या बांधकामांना प्राधान्य देण्यात येत असून रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्र करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.१२)येथे केली.



वर्धमाननगर येथे रेल्वे क्रॉसिंगवर चारपदरी रोड, ओवर ब्रिज तसेच राज्यातील ४८४ कोटी रुपयांच्या नऊ महत्वपूर्ण पायाभूत सुविधांचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी विकसित केलेल्या प्रकल्पाच्या लोकार्पण समारंभाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी होते. यावेळी राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थराज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, आमदार कृष्णा खोपडे, चरणसिंग ठाकूर, महापौर नीता ठाकरे, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी, महारेलचे महाव्यवस्थापक राजेशकुमार जयस्वाल, दयाशंकर तिवारी, महापालिकेचे नगरसेवक, लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार कृष्णा खोपडे यांनी विविध विकासकामांची माहिती दिली. महारेलचे महाव्यवस्थापक राजेशकुमार जयस्वाल यांनी महारेलतर्फे राज्यात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. यामध्ये अमरावती, सातारा, नाशिक, सांगली, नागपूर, चंद्रपूर जिल्ह्यातील तीन रोड ओव्हर ब्रिज, चार सबवे आणि एक रोड अंडरब्रिज या प्रकल्पांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकल्पावर ४८४ कोटी रुपये खर्च झाला असून नागपूर येथील दोन प्रकल्प केंद्रीय रस्ते व पायाभूत सुविधांतर्गत पूर्ण करण्यात आले आहेत. सात प्रकल्प रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासनाच्या ५०:५० खर्च वाटपाच्या तत्त्वावर पूर्ण करण्यात आले आहेत.

रेल्वे फाटकाअभावी दरवर्षी अनेक लोकांचा मृत्यू होत असल्यामुळे रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्र करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचे यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## जनतेचा विश्वास हीच खरी कमाई -लोकनेते रामशेठ ठाकूर

### साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये प्रेरणादायी मुक्तसंवाद



**सातारा : प्रतिनिधी**



साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये गुरुवारी (दि. ९) आयोजित मुक्तसंवादात रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या संघर्षमय जीवन प्रवासाचा प्रेरणादायी उलगडा केला. "आज तुम्ही ज्याला रामशेठ ठाकूर म्हणून ओळखता, तो कधीकाळी न्हावा खाडीतील रेती काढणारा राम होता," असे सांगत त्यांनी बालपणातील कष्ट, रयत शिक्षण संस्थेच्या "कमवा आणि शिका" योजनेतून मिळालेले संस्कार आणि शिक्षक ते उद्योजक असा प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

उद्योग सुरू करताना आईने दागिने गहाण ठेवून दाखवलेल्या विश्वासाची आठवण सांगताना त्यांचा कंठ दाटून आला. "आईने मला सोनं दिलं नव्हतं, तर माझ्यावर विश्वास ठेवला होता," या शब्दांनी सभागृह भावूक झाले. समाजसेवेबाबत बोलताना त्यांनी "समाजाने आपल्याला खूप काही दिले आहे. त्यामुळे समाजाचे देणे फेडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे," असा संदेश दिला. तसेच राजकारण हे सत्तेसाठी नव्हे, तर समाजसेवेसाठी असल्याचे सांगत जनतेचा विश्वास हीच आपली खरी कमाई असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात प्राध्यापकांनी विविध प्रश्नांद्वारे त्यांच्या जीवन प्रवासातील अनेक पैलू उलगडले. विद्यार्थी, प्राध्यापक आणि उपस्थितांनी या मुक्तसंवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संघर्ष, कृतज्ञता, परिश्रम आणि समाजभान यांचा प्रेरणादायी संदेश देणारा हा संवाद उपस्थितांच्या मनात कायमचा घर करून गेला.

## देवकुंड धबधब्यातील डोहात बुडून दोन तरुण पर्यटक बेपत्ता

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध देवकुंड धबधब्यावर प्रशासनाने लागू केलेल्या बंदी आदेशाकडे दुर्लक्ष करून गेलेले दोन तरुण पर्यटक रविवारी (दि. १२) डोहात बुडाले. पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने ही घटना घडली. ही घटना रविवारी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास भिरा–पाटणूस हद्दीतील देवकुंड धबधब्याजवळ घडली. गोपाळ राठोड आणि विष्णू डोके



(वय २३ ते २५ वर्षे) अशी डोहात बुडालेल्यांची नावे आहेत.

दोघेही पुणे जिल्ह्यातील चाकण येथील एका कंपनीत कामाला होते. पावसाळी पर्यटनासाठी चाकणमधील कर्मचाऱ्यांचा एक गट देवकुंड परिसरात आला होता. स्थानिकांच्या माहितीनुसार प्रशासनाने १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी देवकुंड परिसरात कलम १६३ अंतर्गत कडक प्रतिबंधात्मक आदेश लागू केले असतानाही हा गट धबधब्याजवळ पोहचला. खोल डोहात उतरल्यानंतर पाण्याचा अंदाज न आल्याने गोपाळ आणि विष्णू पाण्यात बुडाले.

सोबतच्या मित्रांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला, मात्र डोहाची खोली जास्त असल्याने दोघेही बेपत्ता झाले. रविवारी संध्याकाळी अंधार पडल्याने आणि परिसर दुर्गम असल्याने बचावकार्य थांबवण्यात आले. सोमवारी सकाळपासून बचाव पथकाकडून रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात येणार आहे.

## निवडक

### बंगालच्या उपसागरात भूकंप; विशाखापट्टणममध्ये धक्के

**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यापासून दूर बंगालच्या उपसागरात रविवारी पहाटे ४.५ रिश्टर तीव्रतेचा सौम्य भूकंप झाला. भूकंपाचे धक्के विशाखापट्टणम शहरातील अनेक भागांत जाणवले. यावेळी कोणतीही जीवित वा मालमत्तेचे नुकसान झाले नाही. भूकंपाचे केंद्र काकीनाडापासून २२५ किलोमीटर होते.

### मुंबईत ताज हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवल्याच्या धमकीने खळबळ

**मुंबई :** मुंबईतील ऐतिहासिक ताजमहाल पॅलेस हॉटेलला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाल्याने रविवारी मध्यरात्री एकच खळबळ उडाली. दाऊद इब्राहिमने ताजमध्ये बॉम्ब ठेवला आहे, असा दावा करणारा निनावी फोन आल्यानंतर मुंबई व नवी मुंबई पोलिसांसह सुरक्षा यंत्रणा तातडीने सतर्क झाली, मात्र कसून तपासणीनंतर कोणतेही स्फोटक अथवा संशयास्पद साहित्य आढळले नसल्याने ही धमकी अफवा असल्याचे स्पष्ट झाले.

## शेलू येथे उल्हास नदीत पाय घसरून एकाचा मृत्यू


### मुलीचा फोटो काढताना घडली दुर्घटना

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील शेलू येथील उल्हास नदीत रविवारी (दि. १२) दुपारी एका ४० वर्षीय व्यक्तीचा बुडून मृत्यू झाला. मुलीचा फोटो काढण्यासाठी नदीकाठी असलेल्या दगडावर उभे असताना पाय घसरल्याने दुर्दैवी घटना घडली. मृताचे नाव अभिजित जाधव असून ते वांगणीजवळील डोणे गावचे रहिवासी होते.

अभिजित जाधव त्यांची मुलगी व आणखी पाच सहकाऱ्यांसह शनिवारी रात्री शेलूजवळील खारीक फार्म परिसरात मुक्कामी होते. रविवारी दुपारी १२च्या सुमारास सर्वजण उल्हास नदी परिसरात गेले. मुलीचा फोटो काढण्यासाठी नदीकाठच्या दगडावर उभे असता त्यांचा पाय घसरला आणि तोल जाऊन ते थेट नदीच्या पाण्यात पडले.

त्यांना पोहता येत नसल्याने ते खोल पाण्यात बुडाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक व नेरळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या मदतीने पोलिसांनी नदीपात्रात शोधमोहीम सुरू केली, मात्र शोध लागला नाही.



त्यानंतर खोपोलीतील हेल्प फाऊंडेशनच्या बचाव पथकाला पाचारण केले. अथक प्रयत्नांनंतर स्थानिक व नेरळ पोलिसांच्या मदतीने त्यांचा मृतदेह नदीबाहेर काढण्यात यश आले. तुंगेकर यांच्या रुग्णवाहिकेतून नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, मात्र तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

## सीकेटी कॉलेजमध्ये आज गुणवंतांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष पदवी, पदव्युत्तर वर्गातील व पीएचडी पुरस्कृत गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा सोमवारी (दि. १३) सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्थान स्व. चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून साजरा करण्यात येणार आहे.

साधेपणा, तत्त्वनिष्ठा व समर्पणाचे प्रेरणादायी उदाहरण असलेल्या स्व. चांगू काना ठाकूरसाहेबांच्या स्मरणार्थ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल परिसरातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या उद्देशाने या महाविद्यालयाची स्थापना केली. दरवर्षी त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याची परंपरा जपली जाते. विविध परीक्षांत गुणवंत यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करून प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे उत्कृष्ट शैक्षणिक कार्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर भूषविणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. कविता लघाटे व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित राहणार आहेत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, नगरसेवक व संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य परेश ठाकूर तसेच संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

या सोहळ्यात सर्व पालक आणि विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यार्थी परिषद आणि विद्यार्थी कल्याण कक्षाचे चेअरमन डॉ. एस. एन. परकाळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी. डी. आघाव आणि महिला विकास कक्षाच्या चेअरमन डॉ. आर. डी. म्हात्रे विशेष प्रयत्न करत आहेत.

## माथेरानचे निसर्गसौंदर्य खुलले

### पावसाळी पर्यटनासाठी पर्यटकांची मोठी गर्दी

**माथेरान : बातमीदार**

पावसाला दमदार सुरुवात होताच सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या माथेरान या थंड हवेच्या प्रदूषणमुक्त पर्यटनस्थळाचे निसर्गसौंदर्य आणखीनच खुलले आहे. त्यामुळे देश–विदेशातील पर्यटकांचा ओढा माथेरानकडे वाढला असून मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर पर्यटकांची तोबा गर्दी दिसून येत आहे. हिरवाईने नटलेले माथेरान पॉइंट परिसरातून दिसणारी गर्द हिरवीगार वनराई, डोंगरावरून कोसळणारे पांढरेशुभ्र जलप्रपात आणि कधी कधी दाट धुक्यात हरवून जाणारे लाल मातीचे रस्ते यामुळे पर्यटकांच्या डोळ्यांचे पारणे फिटत आहे.





वर्षा सहलीसाठी माथेरानला आता मोठी पसंती मिळत आहे. सुरक्षित पर्यटनस्थळ म्हणूनही माथेरानची ओळख वाढत आहे. सध्या दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक माथेरानमध्ये दाखल होत आहेत. पावसाळी पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी तरुणाईमध्ये विशेष आकर्षण दिसत आहे. पर्यटक मुख्य पॉइंटवर भटकंती करीत असून शारलेट तलावाच्या सुरक्षित धबधब्याखाली मौजमजा करीत आहेत. अतिउत्साही तरुणांमुळे पावसाळ्यात अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे धबधबे आणि तलावांजवळ जाण्यास प्रशासनाकडून वेळोवेळी बंदी घातली जाते. त्यामुळे पर्यटक सुरक्षित ठिकाणांनाच भेट देणे पसंत करीत आहेत.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, माथेरानमध्ये योग्य काळजी घेतली तर येथे कोणतेही ठिकाण अतिधोकादायक नाही. पर्यटकांनी सूचना पाळाव्यात. अधूनमधून कोसळणाऱ्या पावसाच्या सरींमध्ये पर्यटक स्वतःला हरवून घेत आहेत. सध्या पावसाने थोडी उसंत घेतल्याने पर्यटक उंच डोंगरदऱ्यांमधून कोसळणारे जलतुषार अंगावर घेत आहेत आणि मोबाइल कॅमेऱ्यात ते क्षण टिपत आहेत. स्थानिक ज्येष्ठ नागरिकांच्या म्हणण्यानुसार जुलै महिन्यात माथेरानच्या डोंगरमाथ्यावर जोरदार पाऊस कोसळतो. त्यामुळे पुढील काळात पर्यटकांची गर्दी आणखीन वाढण्याची शक्यता आहे. पावसाळी पर्यटन करून परतणारा प्रत्येक पर्यटक शरीर आणि मनावरील मरगळ झटकून हसत चेहऱ्याने परतत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, पर्यटनस्थळांवरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर पर्यटकांनी सावधगिरी बाळगून पर्यटनाचा आनंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी होणार सर्वपक्षीय बैठक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेचे पावसाळी अधिवेशन येत्या २० जुलैपासून सुरू होत आहे. त्यापूर्वी केंद्र सरकारने १९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेचे कामकाज सुरळीत आणि फलदायी पद्धतीने पार पडावे यासाठी ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होईल. बैठकीला विविध राजकीय पक्षांचे नेते उपस्थित राहणार असून अधिवेशनातील कामकाज आणि इतर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. अधिवेशनादरम्यान संसदेचे कामकाज विनाअडथळा पार पडावे यासाठी विरोधी पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन सरकारकडून या बैठकीत करण्यात येणार आहे.

## उबाठा नेते विनायक राऊतांसह मुलावर सुनेकडून छळाचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील रत्नागिरी–सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे तसेच उद्धव ठाकरे सेनेचे माजी खासदार विनायक राऊत, त्यांचा मुलगा नगरसेवक गितेश राऊत यांच्यासह त्यांच्या संपूर्ण कुटुंबावर त्यांच्या सुनेने गंभीर आरोप केल्याने एकच खळबळ उडाली आहे. तसेच सुनेने दिलेल्या तक्रारीवरून माजी खासदार विनायक राऊत, गितेश राऊत आणि संपूर्ण राऊत कुटुंबीयांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दरम्यान, माजी खासदार विनायक राऊत यांची सून गिरिजा राऊत यांनी त्यांच्याविरोधात पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीमधून



अनेक गंभीर आरोप केले आहेत. राऊत कुटुंबीयांनी आपली फसवणूक केली, मानसिक आणि शारीरिक छळ केला तसेच मांत्रिक आणि बुवाबाबांकडे नेऊन जादुटोण्यासारखी कृत्ये केली. बळजबरीने गोमूत्र प्राशन करायला लावले, असे गिरीजा राऊत यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. गिरीजा राऊत यांनी पती गितेश राऊत यांच्यावरही यावेळी अनेक गंभीर आरोप केले आहेत. दरम्यान, माजी खासदार विनायक राऊत यांनी हे सर्व आरोप खोटे असल्याचे म्हटले आहे.

# आषाढी यात्रेसाठी राज्य परिवहन महामंडळाकडून पाच हजार ५०० विशेष बसेस सोडणार

**पंढरपूर : प्रतिनिधी**

आषाढी यात्रेच्या सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर व्हावा यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून यात्राकाळात ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचे नियोजन केले असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.आषाढी यात्रा नियोजनासाठी चंद्रभागा बस स्थानक,पंढरपूर येथे एस टी महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते.



यावेळी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर, पंढरपूरच्या नगराध्यक्षा श्रीमती प्रणिता भालके व एसटीचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.यावेळी परिवहन मंत्री प्रतापसरनाईक म्हणाले, राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजना' अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना 'महिला सन्मान योजना' अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.

भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी. तसेच पंढरपूरातील विविध बसस्थानकांवर थांबलेल्या बसेसची अंतर्गत व बाह्य स्वच्छता, निर्जंतुकीकरण करावे, आषाढी यात्रेसाठी विशेष बससेवा" असा दर्शनी फलक लावण्यात यावा, त्याचबरोबर चालक व वाहक यांच्या आरोग्याच्या वैद्यकीय तपासणीची बसस्थानक परिसरात व्यवस्था करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. परतीच्या प्रवासासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेवून मार्गनिहाय स्वतंत्र रांगा तयार करून नियोजनबद्ध पद्धतीने प्रवाशांना बसेसमध्ये प्रवेश देण्यात यावा अशा सूचनाही परिवहन मंत्री श्री सरनाईक यांनी दिल्या.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५ हजार १४५ विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सुक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत.

तसेच वारकरी भाविकांसाठी पंढरपूर व परिसरात चंद्रभागा, भीमा (देगाव), विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग (आयटीआय महाविद्यालय) अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत वारी कालावधीत रात्रंदिवस सेवा बजावणाऱ्या महामंडळाच्या १३ हजार कर्मचाऱ्यांना यामध्ये चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी चहा,नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था मंत्री सरनाईक यांनी स्वखर्चाने केली आहे.

## बेलापूरच्या आधुनिक भाजी मार्केटचे लोकार्पण

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

बेलापूर गावातील नागरिकांसाठी आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार विकास निधीतून रु. ४० लाखांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीतून उभारण्यात आलेल्या "भाजी मार्केटचा" लोकार्पण सोहळा आमदार मंदा म्हात्रे व स्थानिक नगरसेविका पूनम पाटील यांच्या शुभहस्ते रविवारी पार पडला.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, बेलापूर गावातील भाजी विक्रेत्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज जागा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज होती. या आधुनिक भाजी मार्केटमुळे विक्रेत्यांना नियोजनबद्ध पद्धतीने व्यवसाय करता येईल, तर नागरिकांनाही स्वच्छ आणि सुविधायुक्त वातावरणात भाजीपाला खरेदी करण्याची सुविधा मिळेल. बेलापूर मतदारसंघातील नागरिकांच्या दैनंदिन गरजांशी निगडित मूलभूत सुविधा निर्माण करून विकासकामांना अधिक गती देणे हेच माझे प्राधान्य असून ते मी अविरतपणे करीत आहे .

स्थानिक नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणारी विकासकामे सातत्याने राबविण्याचा माझा प्रयत्न आहे. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन उभारण्यात आलेले हे भाजी मार्केट बेलापूर गावाच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी मत व्यक्त केले.



# पानवेलींच्या विळख्यात मासेमारी जाळ्या फाटून कोळी बांधवांचे आर्थिक नुकसान



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शासनाने १ जून ते ३१ जुलै या कालावधीत समुद्री मासेमारीवर बंदी लागू केल्यामुळे पारंपरिक कोळी बांधव सध्या खाडी परिसरात मर्यादित स्वरूपात मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. मात्र, यंदाच्या मुसळधार पावसामुळे पनवेल, खारघर खाडी परिसरातून मोठ्या प्रमाणात पानवेली वाहून येत असून, त्याचा फटका दिवाळे कोळीवाड्यासह परिसरातील शेकडो पारंपरिक मच्छिमारांना बसत आहे.

दमदार पावसामुळे पनवेल खाडीपासून दिवाळे खाडीपर्यंत पानवेळींचा प्रचंड साठा निर्माण झाला आहे. खाडीत टाकलेल्या मासेमारीच्या जाळ्यांमध्ये या पानवेळी मोठ्या प्रमाणात अडकत असल्याने जाळ्या वारंवार फाटत आहेत. अनेकदा पानवेळींसोबत साप आणि इतर जलचरही जाळ्यांमध्ये अडकत असल्याने मच्छिमारांना जीव धोक्यात घालून जाळ्या स्वच्छ कराव्या लागत आहेत.

समुद्री मासेमारी बंद असल्याने खाडीतील मासेमारी हाच या काळातील पारंपरिक कोळी बांधवांचा एकमेव आधार असतो. मात्र, पानवेलींच्या वाढत्या विळख्यामुळे मासेमारीसाठी अधिक वेळ, अधिक श्रम आणि अतिरिक्त खर्च करावा लागत असून, त्यातून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

स्थानिक मच्छिमारांच्या मते, दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला काही प्रमाणात पानवेळी खाडीत येतात. मात्र, यंदा त्यांचे प्रमाण अभूतपूर्व आहे. गोड्या पाण्याचा वाढलेला प्रवाह, भरती-ओहोटीचा परिणाम आणि सतत सुरू असलेला मुसळधार पाऊस यामुळे संपूर्ण खाडी परिसर पानवेळींनी व्यापला आहे.

या परिस्थितीची दखल घेत संबंधित प्रशासन आणि मत्स्यव्यवसाय विभागाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत, तसेच जाळ्यांचे नुकसान आणि घटलेल्या उत्पन्नाचा विचार करून पारंपरिक मच्छिमारांना आर्थिक मदत व नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी परिसरातील कोळी बांधवांनी केली आहे.

## नवाबकालीन गारंबी व खरआंबोली धरणे भरली; पर्यटकांना सावधगिरीचे आवाहन

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

सलग पडणाऱ्या पाऊसाने खरआंबोळी धरण भरून वाहू लागले .पर्यटक गेली २ आठवडे धारण भरण्याची वाट पाहत होते .सातवतकडा धबधबा मोट्या प्रमाणात वाहू लागला आहे परंतु तिकडे जाणे सोपे नसल्याने पर्यटक गारंबी व खरआंबोळी धरणावर पाऊसच आनंद घेण्यासाठी जातात .पुढील रविवार पर्यटकांची चंगळ आहे. अजून २ दिवसात खरआंबिली धरण फुल्ल होऊन वाहणार पर्यटकांनी मुख्य धरणात न जात खाली छोट्या धबधब्यात आनंद घ्यावा आणि अपघात टाळावे असे पोलिसांचे आव्हान आहे



गारंबी धारणा इतिहास आहे .जंजिरा संस्थानाचा पुरोगामी विकास करणारे सर सिद्दी अहमदखान यांनी विक्टोरिया राणीच्या भारत भेटीची आठवण म्हणून गारंबीच्या जंगलातील धरणास "विक्टोरिया ज्युबीली वॉटर वर्क्स" हे नाव दिले. विपुल वनसंपत्ती नैसर्गिक पाणी अडवून बांधलेले हे धरण गारंबी धरण म्हणुन प्रसिद्ध आहे. शहरास पिण्याचे पाणी याच ठिकाणावरुन पुर्णपणे नैसर्गिक प्रवाहाच्या वेगाचा वापर करुन केले जाते.

पावसाळ्यात पर्यटक पाण्याच्या प्रवाहांत डुंबण्यासाठी हमखास या ठिकाणी जातात. वनभोजनासाठी हे ठिकाण आदर्श आहे. पाण्याचा मुळ प्रवाह दुषित न करण्याचे सामंजस्य बाळगुन निसर्गाचा आनंद घेण्यास कोणतीच हरकत नाही. दरीत उतरणारी जांभ्या दगडातील पायवाट, चहुबाजूस प्रचंड वृक्षराजी मोठ मोठे खडक, वाहत्या पाण्याची गाज, पक्ष्यांची किलबिल यामुळे पर्यटक गारंबी परिसरात खिळून जातो.

मुरुड गारंबी मार्गे रोहा रास्ता झाल्याने पुणे कोल्हापूर परिसरातील पर्यटक ह्या जंगल मार्गे आनंदाने प्रवास करतात .हामार्ग वळणदार आहे .पावसाळ्यात सर्व परिसर हिरवाईने नटलेला असतो .हल्ली पर्यटकांना पावसाळ्यात भिजण्याचा व पोहण्याचा आनंद घेण्यासाठी ठिकाण पाहिजे असते .जर गारंबी धरणाचा विकास झाला .तर मुरुड शहरातील बेरोजगारांना काम मिळेल

नव्याने झालेले खरआंबोली धारणची पाणीपुरोवठा क्षमता मोठी असल्याने मुरुड शहराला भविष्यत पाणी टंचाई भासणार नाही .खरआंबोली धरणाचे ओव्हरफ्लो पात्र ४०० फूट रुंद असल्याने दर पावसाळ्यात हजारो पर्यटक पोहण्याचा आनंद घेतात

परंतु धरणाच्या ओव्हरफ्लोवर जाण्याचा मार्ग नसल्याने मूळ धरणावरून जावे लागते यावर धारण विभागाची बंदी आहे .यावर शासनाने पर्यटन विकासाचे धोरण आखून पर्यतंतून आर्थिक स्तोत्र कसे निर्माण होईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

## संवेदना संस्थेतर्फे ३५० पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील अनेक गावात १९८९ सारखीच पुरस्थिती निर्माण झाली होती. खरोशी, बळवली परिसरातील पूरग्रस्त कुटुंबांसाठी संवेदना चॅरिटेबल संस्था, पनवेल यांच्या वतीने तूरडाळ, तांदूळ, साखर, मुगडाळ, तेल, हळद, चहा पावडर, कोलगेट, माचीस व बिस्कीट अशा जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेले किट तयार करून एकूण ३५० कुटुंबांना वाटप करण्यात आले.

या उपक्रमाला आवाहन केल्यानंतर एक दिवसात आर्थिक मदतीसाठी नागरिकांनी दिलेला भरभरून प्रतिसाद आमच्यासाठी अत्यंत मोलाचा ठरला. या प्रेमळ सहकार्यामुळेच आम्हाला या गावांपर्यंत मदत पोहोचवणे शक्य झाले. ही मदत जरी लहानशी असली तरी ती आपल्या सगळ्यांच्या प्रेमाची आणि एकोप्याची भावना घेऊन आली आहे. या कठीण काळात आपण एकटे नाही, हेच सांगण्याचा हा आमचा प्रयत्न असल्याचे यांवेळी संस्थेच्या अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी सांगीतले . तसेच सर्व मदत करणाऱ्या मैत्रिणी तसेच दानशूर बंधू-भगिनींचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. पुढील काळातही अशाच सामाजिक उपक्रमांद्वारे गरजूंपर्यंत मदत पोहोचवण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे.



## डेब्रिज माफियांना सिडकोचा दणका; ९ डम्पर जप्त

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोच्या संपादित जमिनींवर अनधिकृतपणे डेब्रिज टाकणाऱ्यांविरोधात सिडकोने कारवाईची मोहीम तीव्र केली असून, १० जुलैला दोन स्वतंत्र कारवायांत ९ डंपर जप्त करून ११ चालकांविरोधात गुन्हे दाखल केले.

सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने उलवेतील शांतीदेवी चौक, सेक्टर-१३, गव्हाण येथे विनापरवाना डेब्रिज वाहतूक करणारे दोन डंपर पकडले. या प्रकरणी चालकांविरोधात उलवे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या कारवाईत वाशी टोलनाका परिसरात मुंबईहून आलेले डेब्रिजचे नऊ डंपर अडवण्यात आले. यात पाच चालकांना ताब्यात घेतले, तर चार चालक वाहने सोडून पसार झाले. सर्व डंपर जप्त करून वाशी पोलिसांत गुन्हे दाखल केले आहेत.

## इमिटेशन ज्वेलरी दुकान फोडून ४२ हजारांचा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल येथील इमिटेशन ज्वेलरीच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने ४२ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

नवीन पनवेल येथील हरिआशीर्वाद हौसिंग सोसायटीतील दुकान क्रमांक ८ मध्ये घडली. चोरट्याने ३० हजार रुपये किमतीचे इमिटेशन ज्वेलरीचे १० नेकलेस सेट तसेच १२ हजार ५०० रुपये किमतीच्या सुमारे ५०० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या वस्तू, त्यात चांदीचा ग्लास, वाटी, बेलपान, सुपारी व छोटा नारळ असा एकूण ४२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

## खांदा कॉलनीत डोळे तपासणी, महाआयडी नोंदणी, ज्येष्ठांची आयुष्यमान नोंदणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार तथा प्रांताध्यक्ष सुनिल तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पनवेल विधानसभा कार्याध्यक्ष व दृष्टी फाऊंडेशन संस्थेचे अध्यक्ष किशोर देवधेकर सर यांच्या वतीने शनिवार ११ जुलै रोजी एस.जी.डी पब्लिक स्कूल, खांदा कॉलनी पनवेल येथे मोफत डोळे तपासणी ,महा आयडी नोंदणी,जेष्ठ नागरिकांची आयुष्यमान नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये मोफत डोळे तपासणी करून चष्म्याचे नंबर काढून अल्प दरात चष्मे देण्यात आले. तसेच ११ शिबिरार्थींना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी लक्ष्मी चारिटेबल आय हॉस्पिटल, पनवेल येथे पाठविण्यात आले. तसेच नागरिकांना महाराष्ट्र शासनाचे महा आयडी नोंदणी करण्यात आली, ७० वर्षांवरील जेष्ठ नागरिकांची आयुष्यमान भारत जनआरोग्य नोंदणी करण्यात आली.

सदर शिबिराचा खांदा कॉलनी, पनवेल,कामोठे, कळंबोली,खारघर परिसरातून १०७ लहान मुले, महिला, पुरुषांनी लाभ घेतला.

सदर प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पनवेल तालुका कार्याध्यक्ष प्रसाद पिंगळे, लक्ष्मी आय हॉस्पिटलचे कॅम्प समन्वयक विनोद पाचघरे,बौद्धजन पंचायत समिती ७४१ चे अध्यक्ष नथुराम साखरे, तक्षशिला सामाजिक व सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष अंकुश मोहिते,जिनावस कदम, पत्रकार तुकाराम म्हस्के, रायगड रिक्षा युनियनचे अध्यक्ष बाळा जगदाळे, सलील शेख,गोरख जाधव, महेश बाविस्कर आदी प्रमुख उपस्थित होते.

## पैसे पडल्याचे सांगून तीन लाख रुपये लंपास

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे

रस्त्यावर पैसे पडल्याचे खोटे सांगून अज्ञात चोरट्यांनी कारमध्ये ठेवलेले ३ लाख रुपये लंपास केल्याची घटना सावरकर चौक, पनवेल, धूतपापेश्वर कंपनीच्या गेटवर घडली. याप्रकरणी अनोळखी चोर त्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सरदार भोगावकर हे करंजाडे, सेक्टर आर-३ येथे राहतात. ते त्यांची कार घेऊन सावरकर चौक येथे गेले होते. ते कारमधून उतरून कामानिमित्त गेले असता, त्यांचा कारचालक बाजीराव पाटील याने धूतपापेश्वर कंपनीच्या गेटसमोर पार्क करून कारच्या मागील सीटर बसले होते. या वेळी अनोळखी इसमाने कारच्या बाजूला रस्त्यावर पैसे पडल्याचे सांगितले. त्यामुळे बाजीराव पाटील हे कारच्या खाली उतरले असता, दुसऱ्या इसमाने कारच्या पाठीमागील सीटवर ठेवलेले तीन लाख रुपये, चेकबुक आणि कागदपत्रे चोरून नेली. हा प्रकार बाजीराव पाटील यांच्या. लक्षात आल्यावर त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल 'केली. त्यानुसार पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यांवर गुन्हा नोंद करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

# ‘वाघमारे दाम्पत्याने विद्यार्थ्यांना चांगले जीवन जगण्याची दिशा देण्याचे कार्य केले’




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी कॉलेजचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुभाष वाघमारे आणि जयसिंगराव मल्हारी करपे हायस्कूल, वर्येच्या मुख्याध्यापिका सुनिता वाघमारे यांच्या सेवापूर्ती सन्मान व कृतज्ञता समारंभात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी बोलताना ठाकूर म्हणाले की, वाघमारे दांपत्याने केवळ नोकरी केली नाही, तर विद्यार्थ्यांना संस्कार, मूल्ये आणि चांगले जीवन जगण्याची दिशा देण्याचे कार्य आयुष्यभर केले. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून समाजाभिमुख आणि सुसंस्कारित नागरिक घडवणे, हीच खरी शिक्षकांची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांच्या संशोधक वृत्तीचे कौतुक करताना, ते प्रत्येक विषयाच्या मुळाशी जाऊन अभ्यास करणारे व्यासंगी व्यक्तिमत्त्व असल्याचे ठाकूर यांनी नमूद केले.

तसेच आपल्या जीवनावर ते पुस्तक लिहित असून, त्यासाठी त्यांनी सखोल संशोधन केले असल्याचेही त्यांनी सांगितले. "ज्ञानाचा व्यासंग करणारी ही जोडी समाजासाठी प्रेरणादायी असून त्यांचे मार्गदर्शन पुढील पिढीला लाभत राहावे," अशी सदिच्छाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते. यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. ज्ञानदेव म्हस्के, जे. के. जाधव, विजय कुंभार, नवनाथ जगदाळे, अनिल दाभाडे, प्राचार्या डॉ. वंदना नलावडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# तळोजा भागातून एक कोटींचा गुटखा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी पानमसाला आणि गुटख्याची नेकायदेशीर बाहतूक व साठवणूक करणाऱ्या मोठ्या आंतरराज्य रॅकेटचा नबी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट-१ने पर्दाफाश केला आहे. तळोजा येथील धरणा गांव येथे करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी सुमारे ६५ लाख रुपये किंमतीचा सुगंधी पानमसाला, गुटख्याचा साठा आणि ४० लाख रुपये किंमतीची ३ वाहने असा तज्जल १ कोटी ५ लाख ६३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर सुगंधी पानमसाला आणि जर्दा नवी मुंबई आणि मुंबई परिसरात विक्री, वितरणासाठी आणण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

तळोजा येथील धरणा गांव येथे शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी पानमसाला आणि गुटख्याचा मोठा साठा नवी मुंबई आणि मुंबई परिसरात वितरीत करण्यासाठी आणण्यात आल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती.

या माहितीच्या आधारे गुन्हे शाखा युनिट १चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेशकुमार महाडीक, पोलीस उपनिरीक्षक प्रदिप जोरुडे आणि त्यांच्या पथकाने १० जुलै रोजी सकाळी तळोजा येथील धरणा गांव येथील नाटली कंपाऊंडमध्ये छापा टाकला. यावेळी सदर ठिकाणी मोठ्या आयशर टेम्पोमधून २ मारुती सुझुकी सुपर कॅरी टेम्पोमध्ये गुटख्याचा साठा भरण्याचे (लोडिंग-अनलोडिंग) काम सुरु असल्याचे निदर्शनास आले.

यावेळी पोलिसांनी सदर ठिकाणावरुन महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला ४८ लाख ६० हजार रुपये किंमतीचा प्रिमीयम राजनिवास सुगंधित पान मसाला आणि प्रिमीअम झेड एन-१ जाफराणी जर्दा तसेच २० लाख रुपये किंमतीचा आयशर प्रो ३०१५ टेम्पो, प्रत्येकी १० लाख रुपये किंमतीचे २ मारुती सुझुकी सुपर कॅरी टेम्पो जप्त केले. तसेच करण राम साळुंखे, दर्शन उर्फ जग्गू ओमप्रकाश कुमार आणि विनोदकुमार प्रभुराम प्रजापती या तिघांना अटक केली. त्यानंतर पोलिसांनी तिघांची कसून चौकशी केली असता, करण साळुंखे याने तळोजा घोट वें म्प येथील निलकमल रेसीडेन्सीतील गाळ्यामध्ये गुटख्याचा साठा लपवून ठेवल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घोट कॅम्प येथील गाळा नं-२ मधून तब्बल १६ लाख रुपये किंमतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधी पानमसाला आणि गुटख्याचा साठा जप्त केला. अशा प्रकारे गुन्हे शाखेने या कारवाईत एकूण १ कोटी ५ लाख ६३ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात ७ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून ४ फरार आरोपींचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.

या गुह्यात अटक करण्यात आलेला आरोपी करण साळुंखे गुटख्याचा मोठा सप्लायर असून त्याच्यावर यापूर्वी ४ ते ५ गुन्हे दाखल आहेत. तो नवी मुंबईच्या बेलापूर ते ऐरोली या पट्ट्यात गुटखा सल्पाय करत होता. त्यानंतर त्याने आता पनवेल तळोजा पट्ट्यामध्ये आपला धंदा सुरु केल्याचे या कारवाईवरुन दिसून येत आहे.

# उरण तालुक्यात गणना प्रपत्र भरण्याच्या प्रक्रियेला वेग

**उरण :** उरण तालुक्यात निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार गणना प्रपत्र भरण्याची प्रक्रिया जोमाने सुरू झाली असून, संबंधित अधिकारी व कर्मचारी नागरिकांकडून आवश्यक माहिती संकलित करीत आहेत. या प्रक्रियेत नागरिकांनी अचूक आणि संपूर्ण माहिती देऊन आपले नाव मतदान यादीत पक्के करावे असे आवाहन उरणचे तहसिलदार डॉ. उद्धव कदम तसेच उरणचे निवडणूक नायब तहसिलदार प्रभाकर नवाळे यांनी केले आहे.

मतदार यादीत आपले नाव पक्के करण्यासाठी एक पासपोर्ट फोटो, आधार कार्ड क्रमांक, मोबाईल नंबर, जन्मतारीख, आई-वडिलांचे पूर्ण नाव त्याचबरोबर त्यांच्या जुन्या ओळखपत्राचा क्रमांक लागणार आहे.सदरची कागदपत्रे आपल्या मतदान केंद्राचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी.एल.ओ) यांच्याकडे जमा करावीत. तसेच कोणतीही माहिती लपवू नये किंवा चुकीची माहीती देऊ नये.

# रायगडच्या नवनियुक्त राज्य उत्पादन शुल्क अधीक्षकांनी स्वीकारला पदभार

**पनवेल : वार्ताहर**

प्रशासकिय कामात दिरंगाई चालढकलपणा करणे, लोकप्रतिनिधी व वरीष्ठांच्या आदेशाकडेही कानाडोळा करणे अशा वृत्तीमुळे दप्तर दिरंगाई नुसार राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांच्यावर शासनाने त्वरीत कारवाईचा बडगा उगारून निष्क्रीय अधिक्षक यांची त्वरीत रायगडातुन बदलीचे आदेश काढावे अशी मागणी रायगडवासीयांतुन केली जात होती.वाढत्या तक्रारीमुळे त्यांची उचलबांगडी झाल्याने त्यांच्या जागी नुकतेच हिंगोली येथे पुर्वी कार्यरत असलेले आदीत्य पवार यांची नियुक्ती राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड येथे झाली आहे

रायगड जिल्ह्यात मुरुड,रोहा तालुक्यात गावठी दारूचा बेकायदेशीर धंदा सुसाट सुरू असताना गारंबी,गोपाळवाटच्या परीसरात विविध गावात हातभट्ट्या मोठ्या प्रमाणात असताना मसाडी, बेलवाडी, टिटवी, पारगाण, नागशेत आदी भागात हातभट्या सुरू होत्या असा नागरीकांचा आरोप होत असताना देखील त्या कडे आर्थीक फायद्याकरीता दुर्लक्ष करणे हे देखील तत्कालीन राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांना विविध वृत्तपत्रात उहापोह झाल्याने शेवटी भारी पडले

हातभट्ट्यांची गावठी दारु रायगडच्या विविध भागातुन रात्रीच्या अंधारात वितरण केली जात होती याला आळा घालण्याचे काम तत्कालीन राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांचे असताना ते मात्र ही गंभीर बाब गांभीर्याने घेत नसल्याने नागरीकांतुन संताप व्यक्त केला जात होतारोहा येथील एका कार्यक्रमात कर्तव्यदक्ष राज्य उत्पादन शुल्क मंत्री महोदय सुनेत्रा ताई पवार यांनी तत्कालीन राज्य उत्पादन शुल्क अधिकारी रायगड यांना दप्तर दिरंगाई व वरील विविध गंभीर बाबींकडे दर्लक्ष केल्याने अधिक्षक यांची कानउघडणी केल्याची रोह्यात चर्चा होती

राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील वाइन शॉप, परमिट रुम यांचे परवाने नुतनिकरण ३१ मार्च पर्यंत करणे बंधनकारक असल्याचा शासन निर्णय आहे त्या नुसार सबंधीत मालक, चालक आपले परवाने लवकरात लवकर नुतनीकरण व्हावे या हेतुने सर्व कागदपत्रे दप्तर तपासणी वेळीच करून स्टेट बॅकेत चलन भरून आपला व्यवसाय ज्या ठिकाणी आहे तेथील तालुक्याच्या ठिकाणी असलेले राज्य उत्पादन शुल्क तालुका कार्यालयात संपुर्ण नुतनिकरणाचे कामकाज पुर्ण करीत होते. तालुका राज्य उत्पादन शुक्ल अधिकारी परवाने नुतनीकरण बाबत फाईल्स ह्या राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांच्याकडे पुढे पाठविल्या जातात परंतु नुतनिकरणाकरीता आलेल्या फाईल्स मध्ये काहीतरी क्युरी काढुन संबधीत परमिट रुम वाईन्सशॉप व ईतर व्यावसाईकांनी तत्कालीन साहेबांची सदिच्छा भेट घेतल्याशिवाय त्यांच्या नुतनिकरणाच्या फाईल्स वर महाशय स्वाक्षरी करीतच नाहीत असा आरोप रायगड जिल्ह्यातील वाईनशॉप व परमिटरूम चालक मालकांनी केला होता .

या ठिकाणी एक चांगला कामसु निस्वार्थ अधिकारी शासनाने नियुक्त करावा अशी मागणी देखील केली होती. वाढत्या तक्रारीमुळे त्यांची उचलबांगडी झाल्याने नागरीकांत समाधान व्यक्त केले जात आहे. त्यांच्या जागी नुकतेच हिंगोली येथे पुर्वी कार्यरत असलेले आदीत्य पवार यांची नियुक्ती राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड येथे झाली आहे.

# नार्कोटिक्स विभागाकडून 'आशा की किरण फाउंडेशन'च्या कार्याचे कौतुक

**पनवेल : वार्ताहर**

व्यसनमुक्ती क्षेत्रात सातत्यपूर्ण, शास्त्रोक्त आणि कायदेशीर चौकटीत राहून कार्य करणाऱ्या आशा की किरण फाउंडेशन या व्यसनमुक्ती केंद्राला नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील डीसीपी, क्राईम ब्रांच व नार्कोटिक्स विभागाच्या अधिकारी वर्गाने भेट देऊन संस्थेच्या कार्याचे विशेष कौतुक केले.



या भेटीदरम्यान अधिकाऱ्यांनी संस्थेतील वैद्यकीय उपचार पद्धती, रुग्णांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सुरक्षित व शिस्तबद्ध व्यवस्थापन, तसेच कायदेशीर नियमांचे काटेकोर पालन यांची पाहणी केली. रुग्णांशी संवाद साधून त्यांचे अनुभव जाणून घेतले तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी व्यसनमुक्ती अभियानाबाबत सविस्तर चर्चा केली.

अनेक वर्षांपासून तज्ज्ञ वैद्यकीय मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले आशा की किरण फाउंडेशन हे केवळ उपचार केंद्र नसून व्यसनाधीन व्यक्तींना नवजीवन देणारे पुनर्वसन केंद्र म्हणून ओळखले जाते. वैद्यकीय उपचारांसोबतच समुपदेशन, योग, सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडा आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध उपक्रम राबवून रुग्णांच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक पुनर्बांधणीसाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. सण-उत्सव, प्रेरणादायी कार्यक्रम आणि सकारात्मक वातावरणाच्या माध्यमातून रुग्णांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य संस्थेकडून केले जाते.यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी संस्थेचे प्रमुख बशीर कुरेशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे समाजाला निरोगी, सक्षम आणि जबाबदार नागरिक घडण्यास मोठी मदत होत असल्याचे मत व्यक्त केले. व्यसनमुक्ती ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून सामाजिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून अशा सकारात्मक कार्याला समाजाने पाठबळ द्यावे. तसेच कोणत्याही अप्रमाणित अथवा कथित माहितीवर विश्वास न ठेवता वस्तुस्थिती जाणून घेणे आवश्यक असल्याचे चित या निमित्ताने अधोरेखित होत आहे.संस्थेच्या वतीने सांगण्यात आले की, आशा की किरण फाउंडेशन हे सर्व लागू कायदे, शासनाचे नियम व संबंधित विभागांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून कार्यरत असून अनेक वर्षांच्या प्रामाणिक सेवेमुळे शेकडो कुटुंबांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यात संस्थेला यश आले आहे. समाजहिताचे हे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

# श्रीया फाऊंडेशन पालेतर्फे दहावी-बारावी गुणवंतांचा गौरव व वृक्षवाटप कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यात सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या श्रीया फाऊंडेशन, पाले यांच्या वतीने दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ, वह्यांचे वितरण सह पर्यावरण संवर्धनाच्या संदेशाप्रती आंब्याच्या लोकांचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण व करिअरविषयक मार्गदर्शनही करण्यात आले.

कार्यक्रमास ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, युवा साहित्यिक रायगड भूषण अजय भोईर (दुरशेत, पेण), सेवानिवृत्त लेखाधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग वसंत का. म्हात्रे, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक चंद्रकांत म्हात्रे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी पोसुराम काळा म्हात्रे, सेवानिवृत्त आर.सी.एफ चे अधिकारी अशोक म्हात्रे, श्रीया फाऊंडेशनच्या अध्यक्षा स्मिता म्हात्रे, सामाजिक कार्यकर्त्या मानसी पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते धर्मा म्हात्रे तसेच पाले गाव अध्यक्ष अमित म्हात्रे उपस्थित होते.

यावेळी श्रिया फाऊंडेशनच्या अध्यक्षा स्मिता म्हात्रे यांनी पाले गावातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन देण्याबरोबरच महिलांसाठी अत्यल्प दरात संगणक अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस व्यक्त केला. संतोष ठाकूर यांनी जिद्द व चिकाटीच्या बळावर कोणत्याही वयात यश मिळवता येते, असा प्रेरणादायी संदेश देत विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. अजय भोईर यांनी कवितेतून विद्यार्थ्यांना संघर्ष, आत्मविश्वास आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेतून जीवनात यश मिळविण्याचा संदेश दिला. वसंत का. म्हात्रे यांनी शिक्षणातील गणिताचे महत्त्व व योग्य शाखा निवडीबाबत मार्गदर्शन केले, तर अशोक म्हात्रे यांनी पुढील पाच वर्षे मनापासून अभ्यास केल्यास उज्ज्वल भविष्य घडू शकते, असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण म्हात्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रमाकांत म्हात्रे, गंगाराम म्हात्रे, विनोद म्हात्रे, संदीप म्हात्रे, मच्छिंद्र म्हात्रे, धनेश्वर म्हात्रे, मायनाथ म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, रुपाली म्हात्रे, दर्शना म्हात्रे व श्रीया म्हात्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.




# पनवेल शहर वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे अपघातग्रस्तांना उपचार

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

रविवार (दि.१२) रोजी सकाळी ११ च्या दरम्यान शिवशंभो नाका ते पळस्पे मार्गावरील मुख्य रस्त्यावर, गाढी नदीपुढे कोस्ट गार्ड बिल्डिंगसमोरील नांदगाव कट येथे दोन दुचाकींचा अपघात झाला. याबाबतची माहिती शिवशंभो सिग्नल येथे वाहतूक नियमन करत असलेले बीट मार्शलवरील पोलीस हवालदार अमीर मुलाणी व पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली.

अपघातात रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेल्या दोन महिला व एका पुरुषाला पोलीस हवालदार अमीर मुलाणी, पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ व उपस्थित नागरिकांच्या मदतीने कोणताही विलंब न करता, ॲम्ब्युलन्सची वाट न पाहता रस्त्याने जाणाऱ्या दोन खासगी ऑटो रिक्षांद्वारे उपचारासाठी तात्काळ पनवेल ग्रामीण रुग्णालयात रवाना करण्यात आले. त्यानंतर अपघातग्रस्त दोन्ही दुचाकी रस्त्याच्या बाजूला काढून बीट मार्शल अंमलदार व नागरिकांच्या सहकार्याने वाहतूक सुरळीत करण्यात आली.

त्यामुळे काही वेळातच वाहतूक पूर्ववत सुरू झाली. या घटनेची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक एपीआय भागवत यांना देण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार पोलीस कर्मचाऱ्यांनी पनवेल ग्रामीण रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली. तिघांचीही प्रकृती स्थिर असून धोक्याबाहेर असल्याचे समजले. यावेळी रुग्णालयात उपस्थित नातेवाईकांनी पोलीस व नागरिकांनी केलेल्या तात्काळ मदतीबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले.



**पनवेल :** भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा अध्यक्ष, आणि माजी गव्हाण ग्रामपंचायत सदस्य ॲड. योगिता सुहास भगत यांच्या वाढदिवसानिमित्त नेरे येथील स्नेहकुंज आधार आश्रमगृहास भेट देऊन त्यांना इन्व्हर्टर आणि अल्पोहार देत त्यांचे आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमास उपस्थित गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत ,गव्हाण पंचायत समिती युवा मोर्चा अध्यक्ष विराज देशमुख,युवा कार्यकर्ते सुहास भगत, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, उद्योजक हेमंत ठाकूर ,वामन शेठ म्हात्रे ,अनंत ठाकूर ,प्रणय कोळी, संतोष भगत ,सुदर्शन घरत, महेश भगत, गजानन पाटील, मीनाक्षी पाटील ,सुजाता सिगं ,परमेश्वरी सुजाता पाटील ,शिवानी रॉय ,मंदा मेढे, शारदा पाटील, श्रावणी भगत ,सायरा भगत, आधार आश्रमाचे संचालक श्री जोशी व कर्मचारी उपस्थित होते.

## संपादकीय

# शेतकऱ्यांना नवी उभारी

शेतकऱ्यांचे आर्थिक बळकटीकरण हेच ग्रामीण विकासाचे खरे अधिष्ठान आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना आणि त्यात नुकत्याच करण्यात आलेल्या सुधारणा या त्याच दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल मानावे लागेल. अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांपर्यंत योजनेचा लाभ पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न स्वागतार्ह आहे.

**राज्याच्या विकासाचा पाया मजबूत करायचा असेल, तर शेती आणि शेतकरी सक्षम असणे अत्यावश्यक आहे. याच विचारातून महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना ही शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याबरोबरच त्यांच्या भविष्यातील प्रगतीचा मार्ग सुकर करणारी योजना ठरत आहे. विशेष म्हणजे या योजनेत नुकत्याच करण्यात आलेल्या सुधारणा अधिकाधिक पात्र शेतकऱ्यांना लाभ मिळावा, या संवेदनशील भूमिकेचे प्रतीक आहेत. योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान काही शेतकरी तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे लाभापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले होते. शासनाने या बाबींची दखल घेत आवश्यक सुधारणा केल्या. पात्रतेच्या प्रक्रियेत सुलभता, कागदपत्र पडताळणीतील अडचणी दूर करणे आणि वंचित लाभार्थ्यांना पुन्हा संधी उपलब्ध करून देणे यामुळे योजनेचा व्याप अधिक व्यापक झाला आहे. हा निर्णय शासनाच्या लोकाभिमुख आणि शेतकरीहिताच्या दृष्टिकोनाची प्रचिती देणारा आहे. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक ताण कमी होतो. नव्या हंगामासाठी पीककर्ज घेणे, शेतीमध्ये गुंतवणूक करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक निर्णय घेणे त्यांना अधिक आत्मविश्वासाने शक्य होते. आर्थिक दिलासा हा केवळ आकड्यांचा विषय नसून, तो शेतकरी कुटुंबाच्या मानसिक स्थैर्याशी आणि भविष्यातील आशावादाशीही जोडलेला असतो. त्यामुळे या योजनेचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने राबविण्यात येणाऱ्या या योजनेला लोककल्याणाची समृद्ध परंपरा लाभली आहे. अहिल्यादेवींच्या कार्यात जनतेचे हित, न्याय आणि विकास यांना सर्वोच्च स्थान होते. त्याच मूल्यांचा वारसा जपत राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले आहे, ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे. राज्यात शेती अधिक सक्षम करण्यासाठी कर्जमाफीसोबत सिंचन प्रकल्प, जलसंधारण, बाजारपेठेचा विस्तार, कृषी प्रक्रिया उद्योग, पीकविमा आणि तंत्रज्ञानाधारित शेती यांसारख्या अनेक उपक्रमांनाही चालना दिली जात आहे. त्यामुळे कर्जमाफी ही एक स्वतंत्र योजना न राहता, शेतकरी सक्षमीकरणाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग ठरत आहे. नुकत्याच झालेल्या सुधारणांमुळे शासनाने शेतकऱ्यांच्या सूचना आणि अडचणी गांभीर्याने ऐकून त्यानुसार निर्णय घेण्याची तयारी दाखवली आहे. लोकाभिमुख प्रशासनाची हीच खरी ओळख आहे. आता या सुधारणांची प्रभावी आणि वेळेत अंमलबजावणी झाली, तर हजारो शेतकरी कुटुंबांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही नवसंजीवनी मिळेल. शेतकऱ्यांचा विश्वास जपणे आणि त्यांच्या प्रगतीला बळ देणे हे कोणत्याही सरकारचे सर्वोच्च कर्तव्य असते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना आणि त्यातील अलीकडील सुधारणा या त्या विश्वासाला अधिक दृढ करणाऱ्या ठरत आहेत. आर्थिक मदतीसोबत आशा, आत्मविश्वास आणि प्रगतीचा नवा मार्ग खुला करणारा हा निर्णय महाराष्ट्राच्या कृषी विकासातील सकारात्मक टप्पा म्हणून निश्चितच नोंदवला जाईल.**

# कर्जमुक्तीची समन्वयातून प्रभावी अंमलबजावणी

राज्याच्या अर्थव्यवस्थेचा पाया असलेल्या कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे अत्यावश्यक आहे. मात्र, अवकाळी पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, बाजारभावातील चढ-उतार, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जबाजारीपणा यांसारख्या संकटांमुळे अनेक शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देतानाच त्यांना पुन्हा आर्थिक प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शेतकऱ्यांचा आर्थिक आत्मविश्वास पुनर्स्थापित करून त्यांना नव्याने कर्ज पात्र बनविण्याचा दूरदृष्टीचा प्रयत्न आहे.

राज्याच्या इतिहासातील सर्वांत मोठ्या कर्जमुक्ती उपक्रमांपैकी एक असलेल्या या योजनेद्वारे सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सहकार विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बँका, महाआयटी, महसूल यंत्रणा, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय प्रस्थापित करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या समस्यांचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाने उच्चाधिकार समितीची स्थापना केली होती. या समितीने शेतकरी कर्जबाजारीपणाच्या समस्येवर अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना सुचविल्या. त्या शिफारशींचा विचार करून तातडीचा दिलासा देण्यासाठी ही कर्जमुक्ती योजना लागू करण्यात आली आहे.

याचबरोबर नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभाची तरतूद करण्यात आली असून कर्जफेडीची शिस्त जपणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या योजनेत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदतीच्या पीक कर्जांचा समावेश करण्यात आला आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित पीक कर्जांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी एकवेळ समजोता (One Time Settlement OTS) योजना लागू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी दोन लाख रुपयांवरील रक्कम भरल्यानंतर शासन त्यांच्या कर्जखात्यात दोन लाख रुपयांपर्यंतची मदत जमा करणार असून उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७पर्यंत मुदत देण्यात आली आहे. योजनेची विश्वासार्हता आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी आधुनिक डिजिटल प्रणालीचा वापर करण्यात आला आहे.

महाआयटीच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या विशेष ऑनलाइन पोर्टलवर सर्व पात्र कर्जखात्यांची माहिती अपलोड केली जात आहे. व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच प्राथमिक कृषी पतसंस्था यांचा या प्रक्रियेत समावेश करण्यात आला आहे. आधार प्रमाणीकरण, संगणकीय पडताळणी आणि थेट लाभ हस्तांतरण (DBT) या माध्यमातून लाभाची रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा केली जाणार आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया अधिक पारदर्शक, अचूक आणि विश्वासार्ह ठरत आहे.

या योजनेतील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे आधार प्रमाणीकरण. पात्र शेतकऱ्यांची ओळख अचूकपणे निश्चित होऊन लाभ योग्य व्यक्तीपर्यंत पोहचावा यासाठी आधार क्रमांक बँक खात्याशी जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे सहकार विभाग आणि बँकांच्या माध्यमातून विशेष आधार-जोडणी अभियान राबविण्यात येत असून शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेत पारदर्शकतेला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय, संबंधित बँक शाखा तसेच ऑनलाइन पोर्टलवर प्रसिद्ध केली जाणार आहे. एखाद्या शेतकऱ्याला यादीबाबत हरकत असल्यास जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे अर्ज करून आवश्यक दुरुस्तीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे लाभ वितरण प्रक्रियेत विश्वासार्हता आणि उत्तरदायित्व अधिक बळकट झाले आहे.

कर्जमुक्तीचा लाभ मिळाल्यानंतर पात्र शेतकरी पुन्हा कर्जपात्र होणार असल्याने आगामी खरीप हंगामासाठी आवश्यक भांडवल वेळेत उपलब्ध होईल. याचा थेट परिणाम शेती उत्पादनवाढ, उत्पन्नवाढ आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या गतिमानतेवर होणार आहे. कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनर्बांधणीला चालना मिळून कृषी क्षेत्राला नवी ऊर्जा प्राप्त होईल.

शेतकरी कल्याणाच्या व्यापक दृष्टीकोनातून राज्य शासन जलसंधारण, सौर कृषी पंप, दिवसा मोफत वीज, कृषी यांत्रिकीकरण, सिंचन सुविधा, प्रमाणित बियाणे, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कृषी उपाययोजना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अशा अनेक पूरक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत आणि स्पर्धात्मक शेती विकसित करण्यासाठीही विविध धोरणात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत.

पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि बँक खात्याची माहिती अद्ययावत ठेवून शासनाच्या सूचनांचे पालन केल्यास या योजनेचा लाभ वेळेत मिळू शकतो. विविध विभागांचा समन्वय, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि पारदर्शक कार्यपद्धती यांच्या बळावर राबविण्यात येत असलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनरूत्थानाचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून शेतीला अधिक सक्षम, शाश्वत आणि समृद्ध करण्यासाठी ही योजना निश्चितच मैलाचा दगड ठरेल.

**-वृषाली पाटील,**
सहाय्यक संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

# पावनखिंडीत स्वराज्यासाठी प्राणाचे बलिदान देणारे बाजीप्रभू देशपांडे


पावनखिंडीतील लढाई ही मराठी इतिहासातील एक महत्वाची लढाई मानली जाते. ही लढाई १३ जुलै १६६० रोजी विशाळगडानजीक पूर्वीच्या घोडखिंड येथे झाली.

पन्हाळयाच्या वेढ्यातून निसटून छत्रपती शिवाजी महाराज विशाळगडाकडे कूच करत होते. आदिलशाही सेनेला त्याचा सुगावा लागला व महाराजांच्या मागे आदिलशाही सेनेचा पाठलाग चालू झाला. जेव्हा महाराज व त्यांचे साथीदार घोडखिंडीत पोहचले त्यावेळेस बाजीप्रभू देशपांडे यांनी महाराजांना विनंतीवजा आदेश दिला की, महाराजांनी पुढे गडावर जावे व जोवर महाराज गडावर पोचत नाहीत तोवर बाजी ही खिंड लढवतील व शत्रूला तिथेच रोखून धरतील. 'लाख मेले तरी चालतील, पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे,' असे बाजीप्रभूंनी महाराजांना विनवले.



आदिलशाही फौजेचे नेतृत्त्व सिद्दी जौहरकडे होते. त्याला सिद्दी मसूद व फाजल खान (अफझलखानाचा मुलगा) यांची साथ होती. जौहरची एकूण फौज १०,०००ची होती तर महाराजांसोबत फक्त ३०० ते ६०० मावळे होते. महाराजांनी पौर्णिमेच्या रात्री गडावरुन उतरून वेढा तोडला व विशाळगडाकडे कूच केले. महाराजांनी आपल्यासारख्याच दिसणाऱ्या शिवा काशिद नावाच्या व्यक्तीला पाठीमागे ठेवले. जेव्हा जौहरला शिवाजी महाराज विशाळगडाकडे गेले आहेत, असा सुगावा लागला तेव्हा त्याने सिद्दी मसूदला महाराजांच्या मागावर पाठवले व त्यांचा पाठलाग चालू झाला. काही वेळाने महाराज व साथीदार घोडखिंडीत पोहचले.


बाजीप्रभूंनी महाराजांना स्थिती समजावून विशाळगडावर प्रस्थान करायला लावले. खिंडीत मसूदचे सैनिक पोहचल्यावर चिंचोळ्या वाटेत केवळ एक दोनच सैनिक मराठ्यांच्या रांगेपर्यंत पोहोचत व मारले जात. बाजीप्रभू, फुलाजी, संभाजी जाधव, बांदल यांनी आपापल्या कमानीतून मसूदच्या सैनिकांना ठार केले. बाजीप्रभूंच्या आवेशाने अनेकांची गाळण उडवली. मसूदने बंदुकधाऱ्यांना कड्यावर चढून बाजीप्रभूंवर गोळीबार करण्याचा आदेश दिला. बाजींवर गोळ्या झाडण्यात आल्या. बाजीप्रभू जखमी झाले तरी त्यांनी सैनिकांना कोणत्याही परिस्थितीत आपली जागा सोडू नका, असे बजावले. काही वेळातच शिवाजी महाराज विशाळगडावर पोहचले. त्यांनी तोफांचा गजर दिला. इकडे घोडखिंडीत बाजीप्रभूंनी तोफांचा गजर ऐकल्यानंतरच कर्तव्यपूर्तीच्या समाधानाने आपला जीव सोडला. बाजीप्रभू व इतर मराठा सैनिकांच्या बलिदानामुळे ही जागा पावन झाली म्हणून घोडखिंडीचे नाव पावनखिंड असे पडले. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

## 'जिओ'च्या नव्या प्लॅनमध्ये १,०००पेक्षा जास्त चॅनेल्स

देशातील सर्वात मोठी दूरसंचार कंपनी रिलायन्स जिओने ग्राहकांसाठी परवडणारा नवीन JioTV Pro Pack आणला आहे. अवघ्या ₹५५ च्या या पॅकमध्ये ग्राहकांना



१,००० हून अधिक टीव्ही चॅनेल्स पाहण्याची सुविधा मिळणार आहे. विशेष म्हणजे, हा प्लॅन खास मनोरंजनासाठी तयार करण्यात आला असून, यामध्ये कॉलिंग किंवा इंटरनेट डेटाचा समावेश नाही.

जिओचा JioTV Pro Pack ३० दिवसांच्या वैधतेसह उपलब्ध आहे. या पॅकसाठी ग्राहकांना ₹५५ मोजावे लागतील. मात्र, हा केवळ एंटरटेनमेंट पॅक असल्यामुळे यामध्ये व्हॉईस कॉलिंग, मोबाईल डेटा आणि एसएमएस यांसारखे कोणतेही टेलिकॉम फायदे मिळणार नाहीत. तसेच हा पॅक वापरण्यासाठी ग्राहकाच्या जिओ क्रमांकावर आधीपासून सक्रिय बेस रिचार्ज प्लॅन असणे आवश्यक आहे.

JioTV Pro Packमध्ये काय मिळणार?

या पॅकमध्ये ग्राहकांना १,०००पेक्षा अधिक टीव्ही चॅनेल्स पाहता येतील. यामध्ये म्युझिक, चित्रपट, बातम्या, किड्स, लाइफस्टाइल आणि मनोरंजन...अशा विविध प्रकारातील चॅनेल्सचा समावेश आहे. याशिवाय ग्राहकांना १६ वेगवेगळ्या भाषांमधील कंटेंट आणि १५०हून अधिक प्रीमियम टीव्ही चॅनेल्सची सुविधाही मिळणार आहे.

**कोणते लोकप्रिय चॅनेल्स मिळणार?**

JioTV Pro Pack अंतर्गत ग्राहकांना अनेक लोकप्रिय नेटवर्क्सवरील चॅनेल्स पाहता येणार आहेत. त्यामध्ये Sony Entertainment, Warner Bros, Discovery, JioStar, Star Plus, Sony SAB, Sun TV, Colors HD यांसारख्या चॅनेल्सचा समावेश आहे, मात्र Sony आणि JioStar समूहातील कोणतेही स्पोर्ट्स चॅनेल या पॅकमध्ये उपलब्ध नसतील, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**एका डिव्हाइसवरच वापरता येणार**

हा पॅक JioTV ॲपद्वारे वापरता येईल आणि तो फक्त एका डिव्हाइसवर सक्रिय करता येईल. ग्राहक जिओ ॲपद्वारे किंवा ऑफलाइन पद्धतीनेही हा रिचार्ज करू शकतात. रिचार्ज पूर्ण झाल्यानंतर JioTV ॲपमध्ये नोंदणीकृत मोबाईल क्रमांकाद्वारे साइन-इन करावे लागेल.

# ज्येष्ठ अभिनेते निळू फुले

मराठी नाट्य-चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय व ज्येष्ठ अभिनेते अशी निळू फुले यांची ओळख राहिली आहे. आज त्यांचा स्मृतिदिन. त्यांचे मूळ नाव निळकंठ कृष्णाजी फुले. 'निळूभाऊ' या नावाने ते सुपरिचित झाले. त्यांचा जन्म २५ जुलै १९३१ रोजी पुणे येथे झाला.



निमित्त

निळू फुलेंचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. उद्यानविषयक पदविकाही त्यांनी मिळविली, मात्र त्यांना अभिनयाची किशोरवयापासूनच विलक्षण आवड होती. आपल्या ऐन तारुण्यात त्यांनी पुणे येथील आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजच्या उद्यानात माळी म्हणून काम केले. याच सुमारास त्यांचा राष्ट्र सेवा दलाशी संबंध आला. आपल्या ८० रुपये मासिक पगारातील दहा रुपये ते दरमहा राष्ट्र सेवा दलाच्या कार्यासाठी देत. राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकात त्यांनी काम केले. या वेळी वसंत बापट, पु.ल. देशपांडे या दिग्गजांशी त्यांचा संपर्क आला. खरेतर त्यांना माळी म्हणूनच पुढे कार्य करावयाचे होते. त्यासाठी ते स्वतःची रोपवाटिका (नर्सरी) सुरू करण्याच्या विचारात होते, परंतु घरची परिस्थिती बेताची असल्याने त्यांना पुरेशा भांडवलाअभावी हा विचार सोडून द्यावा लागला. राष्ट्र सेवा दलात कार्य करीत असताना त्यांना वाचनाची गोडी लागली.


रवींद्रनाथ टागोरांच्या साहित्याने ते प्रभावित झाले. याच काळात त्यांनी उद्यान हे नाटकही लिहिले होते. १९५७च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्र सेवा दलाच्या कलापथकासाठी येरा गबाळ्याचे काम नोहे हा वग लिहिला. या वगाच्या सादरीकरणाने त्यांना प्रसिद्धी तर मिळालीच; शिवाय त्यांच्या अभिनयकौशल्याची चुणूक इतरांना जाणवली. त्यानंतर पु.ल. देशपांडे यांच्या पुढारी पाहिजे या नाटकात 'रोंगे'ची भूमिका साकारून त्यांनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले, मात्र कथा अकलेच्या कांद्याची या वगनाट्यातील भूमिकेमुळे ते खऱ्या अर्थाने कलाकार म्हणून पुढे आले. या लोकनाट्याचे मराठी रंगभूमीवर दोन हजारांहून अधिक प्रयोग झाले. या नाटकामुळे त्यांना एक गाव बारा भानगडी (१९६८, दिग्दर्शक अनंत माने) या चित्रपटात भूमिका मिळाली व त्यांचे चित्रपटसृष्टीत पदार्पण झाले. या चित्रपटात त्यांनी साकारलेली 'झेलेअण्णा' ही विनोदी खलनायकाची भूमिका अत्यंत गाजली. त्यांच्या नाट्य-कारकिर्दीत विजय तेंडुलकरलिखित सखाराम बाइंडर (१९७२, दिग्दर्शक कमलाकर सारंग) या नाटकातली त्यांची खलनायकी ढंगाची भूमिका विलक्षण प्रभावी ठरली. या नाटकाचे, त्यातील आशयाचे आणि निळू फुले यांच्या भूमिकेचे समीक्षकांनी स्वागत केले. पुढारी पाहिजे, बिन बियांचे झाड, कुणाचा कुणाला मेळ नाही, कथा अकलेच्या कांद्याची, लवंगी मिरची कोल्हापूरची, मी लाडाची मैना तुमची, राजकारण गेलं चुलीत यांसारख्या लोकनाट्यांमधून त्यांनी भूमिका केल्या. ही सर्वच लोकनाट्ये गाजली.

सलग ४० वर्षे ते चित्रपटसृष्टीत व रंगभूमीवर सक्रिय होते. कारकिर्दीत त्यांनी १४०हून अधिक मराठी चित्रपट व १२ हिंदी चित्रपटांतून भूमिका केल्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. १३ जुलै २००९ रोजी पुणे येथे अन्ननलिकेच्या कर्करोगाने त्यांचे निधन झाले.

**-संतोष पाठारे (मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

## पावसाळ्यात कानाला दडे बसणं, दुखणं धोक्याचं!

बऱ्याच ठिकाणी पावसाचा जोर चांगलाच वाढला आहे. पाऊस आला की, सगळीकडे गार वारे वाहू लागतात. कारण या दिवसांमध्ये हवेत ओलावा वाढतो. बरं या वातावरणाने उष्णता कमी होते, पण इतर अनेक समस्याही डोकं वर काढतात. अनेकांची तक्रार असते की, पावसाळ्यात त्यांचे कान अधिक दुखतात, ज्याचं कारण त्यांना समजून येत नाही. मुळात हवेत वाढलेल्या ओलाव्यामुळे आरोग्यासंबंधी अनेक समस्या होऊ लागतात.



जेव्हा सर्दी होते किंवा घशाला जंतुसंसर्ग होतो, तेव्हा युस्टेशियन ट्यूबला सूज येते किंवा ती कफाने भरून जाते. यामुळे ती उघडून हवेचा दाब संतुलित करू शकत नाही आणि दडे बसतात. पाण्याखाली खोलवर गेल्यावर पाण्याचा दाब वाढतो, ज्यामुळे कानाचा पडदा आतल्या बाजूला ढकलला जातो आणि दडे बसतात.

असं मानलं जातं की, कानाच्या आतील भाग नेहमीच कोरडा रहायला हवा, पण पावसाळ्यात सतत ओलावा राहत असल्याने कानातील वॅक्स नरम होतं आणि त्याच्या काम करण्याच्या क्षमतेत अडथळा येतो. सोबतच ज्या लोकांना आधीच कानासंबंधी काही समस्या असतात, त्यांच्या कानात बॅक्टेरिया आणि फंगस वाढण्याचा धोका अधिक असतो. अनेक केसेसमध्ये कानात वेदना होत असल्याने कोणता मोठा आजार होत नाही. अनेकदा सर्दी-पडला किंवा ॲलर्जीमुळेसुद्धा कानात वेदना होतात.

एक्सपर्ट सांगतात की, ज्या लोकांना कानासंबंधी काही ना काही समस्या आहे, त्यांनी पावसात भिजणं टाळावं आणि जर भिजलेच तर त्यांनी कान चांगले पुसावे. जर पुसल्यानंतरही कानात ओलावा जाणवत असेल तर कान कोरडे करण्यासाठी दुरून हेअर ड्रायरचासुद्धा वापर करू शकता.

जर कानातील ओलावा दूर झाला असेल तरी सुद्धा कान बंद होत असेल किंवा जडपणा जाणवत असेल तर काही सोपे घरगुती उपाय करू शकता. जसे की, गरम पाण्याने किंवा गरम कापडाने कानाच्या आजूबाजूला शेक द्या, गरम पाण्याने ५ ते १० मिनिटे वाफ घ्या. सोबतच कोमट पाण्याने गुरळा करा. यानेही कानाला आराम मिळू शकतो. पण सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे या उपायांनी कानाचं हलकं दुखणं दूर होऊ शकतं. जर कानात जास्त वेदना असतील आणि जडपणा वाटत असेल तर वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# पोलादपूर तालुक्यातील पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करणार -सभापती चंद्रकांत कळंबे

## नरवीर एडव्हेंचर्सच्या रिव्हर राफ्टिंग बुकिंग कार्यालयाचे उद्घाटन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील साहसी खेळांच्या परंपरेला आधुनिकतेची जोड देणाऱ्या रानबाजिरे धरणापासून उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या खळाळत्या पात्रात रिव्हर राफ्टिंग सारख्या धाडसी खेळाद्वारे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्याची बुकिंग कार्यालयाची उद्योजक रामदास कळंबे यांची संकल्पना येत्या काळात पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्यासाठी पोषक असल्याचे मत रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण, अर्थ व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे यांनी व्यक्त केले.



लोहारे गावांतील नरवीर ढाबाच्या प्रांगणात उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पात्रालगत नरवीर एडव्हेंचर्सच्या रिव्हर राफ्टिंग बुकिंग कार्यालयाचे उदघाटन राजिपचे शिक्षण, अर्थ व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे यांच्या हस्ते रविवारी सकाळी करण्यात आले. याप्रसंगी उद्योजक रामदास कळंबे, नारायण कळंबे, नंदू कळंबे, शहरप्रमुख सुरेश पवार, युवा सेना तालुका प्रमुख विक्रम भिलारे,गणेश उतेकर तसेच नरवीर संस्थेचे पदाधिकारी व युवासेना कार्यकर्ते उपस्थित होते.

पोलादपूर तालुक्यातील वर्षा पर्यटनाचा मानबिंदू असलेला घागरकोंडचा झुलता पूल २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे वाहून गेला. तत्पूर्वी, झुलत्या पुलाची दुरुस्ती रायगड जिल्हा परिषदेमार्फत नियमित होत राहिली. मात्र, आजतागायत झुलता पुल वाहून गेल्यानंतर कोणत्याही प्रकारची तरतूद झाली नसल्याकडे प्रस्तुत प्रतिनिधीने विचारणा केली. यावर रायगड जिल्हा परिषदेचे सभापती चंद्रकांत कळंबे यांनी कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी नसतानाही पर्यटकांना झुलत्या पुलाचे फार मोठे आकर्षण होते. हा झुलता वाहून गेल्यानंतर राज्य शासनाकडे तत्कालीन आमदार भरतशेठ गोगावले यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा करून ३.५ कोटींचा निधी आवश्यक असल्याचे प्रस्तावित केले. याच काळात गुजरात राज्यातील झुलता पूल कोसळल्याने शासनाने झुलता पूल उभारण्यास अनुत्सुकता दर्शवली. मात्र, यानंतरच्या काळात भरतशेठ गोगावले मंत्री झाल्यानंतर त्यांनी झुलता पूल उभारण्यासाठी ७ कोटी रुपयांच्या प्रस्तावानुसार शासनाकडे मागणी केली असून लवकरच या प्रस्तावाला मंजूरी मिळाल्यानंतर पुन्हा घागर कोंड येथे पर्यटकांचे पावसाळ्यातील आकर्षण असलेल्या झुलत्या पुलाची निर्मिती केली जाईल, अशी ग्वाही दिली. तरुणाईच्या मनातले साहसी पर्यटनाचे वेध लागले असताना उत्तरवाहिनी सावित्री नदी पात्रातील पाणी ओसरल्यामुळे रिव्हर राफ्टिंग करण्यासाठी नवीन पिढी आवर्जून येत असल्याचे उद्योजक रामदास कळंबे यांनी सांगितले.

## पावसाच्या प्रवाहाने रस्ता गेला वाहून; ग्रामस्थांची चिंता वाढली



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील माडप मुठा ठाकूरवाडी येथे मुसळधार पावसामुळे डोंगराला मोठ्या प्रमाणात भेगा पडून काही ठिकाणी भूस्खलन झाल्याचे समोर आले आहे. याचदरम्यान गावाकडे जाणारा मुख्य रस्ता वाहून गेल्याने येथील नागरिकांचा संपर्क धोक्यात आला असून दैनंदिन प्रवासाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आह रस्त्याच्या दुरुस्तीसाठी नुकतेच ठाकूर समाजातील ग्रामस्थांनी माडप येथे आंदोलन छेडले. काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्याने सावरोलीखारपाडा मार्गही रोखून धरण्यात आला होता.त्यानंतर प्रशासनाच्या मध्यस्थीने रस्त्याचे काम लवकर सुरू करून पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्ष काम सुरू होण्यापूर्वीच झालेल्या मुसळधार पावसाने रस्त्याची अक्षरशः दाणादाण उडवली.सुमारे दोन ते तीन किलोमीटरचा डोंगरद ऱ्यातून जाणारा हा मार्ग अनेक वर्षांपासून ग्रामस्थांच्या दैनंदिन जिवनात वापरात आहे. रस्ता खचल्यामुळे आता या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक बनले आहे. डोंगराला पडलेल्या भेगा आणि भूस्खलनामुळे भविष्यात आणखी मोठा धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. डोंगररांगांच्या सानिध्यात वसलेल्या या ठाकूरवाडीतील नागरिकांना बाजारपेठ, आरोग्य सेवा तसेच अन्य शासकीय कामांसाठी खोपोली, चौक आणि खालापूर येथे याच मार्गाने जावे लागते. मात्र रस्ता बंद झाल्याने त्यांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वेळेवर दुरुस्तीचे नियोजन न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून संबंधित विभागाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती, भूस्खलनग्रस्त भागाचे संरक्षण आणि सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## फरार आरोपीचा शोध; माहिती देण्याचे पोलिसांचे आवाहन

**माणगाव :** माणगाव पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीचा शोध सुरू असून, संबंधित आरोपीबाबत माहिती मिळाल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन माणगाव पोलिसांनी केले आहे.माणगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १२०/२०२६ हा भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१८(४), ३५१(१), ३५२, ६४, ६४(२)(आय) व ६४(२)(एम) अन्वये दि. २५ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १.४९ वाजता दाखल करण्यात आला आहे.या गुन्ह्यातील आरोपी औदुंबर मनोहर गडदे (रा. तरटगाव, ता. पंढरपूर, जि. सोलापूर) हा गुन्हा दाखल झाल्यापासून फरार असून पोलीसांच्या नजरेआड झाला आहे.

## मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

माजी आमदार तुकाराम सुर्वे यांच्या स्मरणार्थ तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, कर्जत, दादर – मुंबईतील ज्योविस आयुर्वेद आणि नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर व मोफत औषधे वाटप शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात २१५ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे प्रतिष्ठानने आयोजित केलेले ३९ वे आरोग्य शिबिर होते.कर्जत शहरातील श्री धापया महाराज मंदिराच्या सभागृहात मोफत आयुर्वेदिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, डॉ. ज्योती सातपुते, मनीषा सुर्वे, ज्योती पाटील, प्रदीप गोगटे, पूजा वैद्य, पद्मजा देशमुख आदी उपस्थित होते.



मुकेश सुर्वे यांनी आम्ही कर्जतसह अन्य ठिकाणी मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरे आयोजित करून आरोग्य आपल्या दारी संकल्पना राबवत असल्याचे सांगितले.

## ताम्हिणी घाट : सह्याद्रीचा स्वर्गीय प्रवास



**माणगाव :** पुणे आणि कोकण यांना जोडणारा ताम्हिणी घाट म्हणजे निसर्गाचे साक्षात सौंदर्यस्थळ. पावसाळा सुरू झाला की, सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यातून उगवणारे धबधबे, ढगांच्या कुशीत हरवलेली शिखरे, हिरव्यागार दऱ्या आणि गूढ शांतता... या सगळ्याचं एक विलक्षण जादूई जग ताम्हिणी घाटात फुलतं. परंतु ताम्हिणी घाट हा केवळ पर्यटनासाठीचा मार्ग नाही, तर तो पुणेकोकण या दोन संस्कृतींचा सेतू आहे. कोकणातील लोक या घाटामार्गे पुण्याकडे शिक्षण, नोकरी आणि व्यवसायासाठी जातात, तर पुण्याचे लोक निसर्गाच्या सान्निध्यासाठी या घाटात रममाण होतात. या मार्गाने प्रवास करताना सह्याद्री आपल्याशी थेट संवाद साधतो. प्रत्येक वळणावर तो नवे रहस्य उलगडतो.

कोकणचं कॅलिफोर्निया करण्याचं स्वप्न उराशी बाळगून तत्कालीन मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांनी १९८१ मध्ये रायगड आणि पुणे या दोन जिल्ह्यांना जोडणारा माणगाव – ताम्हिणी घाट – पुणे हा राज्य मार्ग मंजूर केला होता. मात्र वनविभागाने पर्यावरणाचे संरक्षणाचे कारण देत २० वर्षे अडथळा निर्माण केला होता. तत्कालीन आमदार अशोक दादा साबळे यांनी पाठपुरावा केला. मात्र सुनील तटकरे आमदार आणि पुढे मंत्री झाल्यावर वनविभाग, आर्थिक निधी, उंचच उंच कडे–कपारी, खोलच खोल दर्या, जीवघेणी वळणे आदी अडथळ्यांची शर्यत दूर करून यशस्वीपणे मार्गक्रमण करत हा राजमार्ग २००१ मध्ये प्रत्यक्षात सुरू करुन अंतुले यांचे स्वप्न साकार केले. त्यानंतर माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, दिवेआगर, मुरुड, अलिबाग, महाड, पोलादपूर आणि कोकणातील पर्यटन झपाट्याने वाढत जाऊन खर्या अर्थाने बहरले. त्यानंतर २०१९ मध्ये खासदार सुनील तटकरे यांनी दिघी – माणगाव – पुणे या महामार्गाचे दुपदरीकरण केल्यावर पर्यटकांची वर्दळ आणखी वाढली.

### निसर्गाचे अप्रतिम वैभव

ताम्हिणी घाटाचा पावसाळा म्हणजे एक जीवंत चित्रपट. कोसळणारा मुसळधार पाऊस, पाण्याचे फेसाळ झरे, आणि धुक्याने झाकलेली शिखरे... यामुळे इथल्या प्रत्येक दृश्यात सौंदर्य आणि शांती आहे. हा घाट म्हणजे छायाचित्रकार, निसर्गप्रेमी आणि पर्यटकांसाठी स्वर्गच आहे. देव कुंड धबधबा आणि कुंभे–केळगण या थंड हवेच्या नैसर्गिक परीसरात निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण केली आहे. या दोन्ही ठिकाणी पर्यटकांची संख्या वाढत आहे. पण या सौंदर्याबरोबरच येथे निसर्गाचे सामर्थ्यही अनुभवायला मिळते. अतिवृष्टी, भूस्खलन, दाट धुके आणि अरुंद वळणे हे सगळं या घाटाचं दुसरं रूप आहे. त्यामुळे पर्यटकांनी या निसर्गदेवतेचा सन्मान राखत काळजीपूर्वक प्रवास करावा, हीच अपेक्षा.

### वनसंपदा आणि जैवविविधतेचा खजिना

ताम्हिणी परिसरातील जंगलं आणि अभयारण्ये आजही सह्याद्रीच्या नैसर्गिक संपत्तीचे जिवंत प्रतीक आहेत. इथं वाघ, अस्वल, मोर, साप, विविध प्रकारची पक्षी आणि दुर्मिळ औषधी वनस्पती आढळतात. हीच संपदा पुढील पिढ्यांसाठी जतन करणे आपले नैतिक कर्तव्य आहे. नव्या रस्त्यांच्या widening मुळे आणि पर्यटनाच्या अतिरेकामुळे या परिसंस्थेवर ताण वाढू लागला आहे. त्यामुळे विकासाबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे.

### विकासाचा मार्ग आणि जबाबदारी

अलीकडील काळात ताम्हिणी घाटाचा रस्ता सुधारला गेला, नवे पूल आणि सुरक्षा भिंती बांधल्या गेल्या. यामुळे प्रवास अधिक सुरक्षित झाला असला, तरी वाढत्या वाहनांमुळे कचरा, प्लास्टिक आणि आवाज प्रदूषण वाढू लागले आहे. आपण निसर्गाचा आनंद घेताना त्याला इजा पोहोचवू नये. ही जाणीव प्रत्येक प्रवाशामध्ये असायला हवी. "निसर्ग तुमचा पाहुणा नाही, तो तुमचा घरचा आहे" हे समजणं काळाची गरज आहे.

या निसर्गरम्य परिसरात पर्यटकांना कोणत्याही सोयी–सुविधा नसल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पावसाळ्यात अधिक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात यावा. शासकीय विश्रामगृह नव्याने बांधण्यात यावा. वळणांवर दिशादर्शक फलक लावण्यात यावेत. ठिक ठिकाणी प्रसाधनगृहे आणि शौचालये बांधण्यात यावीत. अवघड आणि तीव्र उताराच्या ठिकाणी मजबूत लोखंडी कठडे करण्यात यावेत. रुग्णवाहिका ठेवण्यात यावी.भविष्यात हा महामार्ग चौपदरी करण्यात यावा अशा विविध मागण्या प्रवाशी आणि पर्यटक यांनी केल्या आहेत. त्या पूर्ण झाल्यास अपघात होणार नाहीत. तसेच खुल्या निसर्गाच्या सान्निध्यात मनमोकळेपणाने आनंद लुटता येईल.

### ताम्हिणी सह्याद्रीचा आत्मा

ताम्हिणी घाट हा केवळ एक मार्ग नसून सह्याद्रीच्या आत्म्याचा श्वास आहे. इथं निसर्ग, संस्कृती आणि मानवी नाते यांचं सुंदर मिश्रण आहे. या घाटातील प्रत्येक झाड, प्रत्येक पाणथळ आपल्याला सांगते, "निसर्गाची ओळख करून घ्या, पण त्याचं रक्षण करा." सह्याद्रीच्या कुशीत वसलेला ताम्हिणी घाट आपल्याला दरवेळी स्मरण करून देतो की, "विकास निसर्गाशी विसंवादात नव्हे, तर समन्वयातच टिकतो."

ताम्हिणी घाट हा महाराष्ट्राच्या निसर्गरम्य सौंदर्याचा रत्नजडित मुकुट आहे. त्याची हिरवाई, त्याचं पाणी, त्याची हवा... हे सगळं आपल्या भावी पिढ्यांसाठी राखणं हीच खरी देशसेवा आहे. चला, या निसर्गमातेच्या कुशीत विसावूया... पण तिला जपण्याचं वचन देऊनच पर्यटनाला चालना देऊया.

## अचानक गायब झालेल्या पावसामुळे शेती आणि जनजीवनावर परिणाम

**चौक : प्रतिनिधी**

अनेक दिवस पावसाची वाट पाहत असताना पडलेल्या पाऊसाने अनेकांचे जनजीवन अस्तव्यस्त करून अनेकांना आपले जीव गमवावे लागले, आणि हा पाऊस गायब झाल्याने शेती ते मनुष्य यांच्यावर परिणाम होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

पावसाळी हंगामात अचानक पाऊस जाणे किंवा पावसाचा मोठा खंड पडल्यास शेतीचे प्रचंड नुकसान होऊन त्याचा अर्थव्यवस्था आणि पर्यावरणावर गंभीर परिणाम होतील असे बोलले जात आहे.हवामानातील बदलांमुळे मान्सूनच्या प्रवाहात अशा अचानक चढ–उतार सुरू झाले आहेत.खरीप हंगामात सुरुवातीला पाऊस चांगला पडून अचानक थांबल्यास पेरलेले शेताचे नुकसान मोठ्या प्रमाणात होऊन शेतकरी याला दुसऱ्यांदा पेरणी करावी लागेल, बयासाठी बी बियाणे यांचा खर्च वाढून पूर्वी केलेले सर्व कष्ट वाया जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पेरलेले बियाणे उगवण्यास सुरुवात झाली आहे.पाऊस गायब झाल्याने अंकुर फुटलेली बियाणे करपून जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यामुळे पिकांचे नुकसान होऊ लागले आहे. अचानक पाऊस जाऊन कडक उन्हाळा सुरू झाला आहे, यात हवामान कोरडे राहिल्याने पिकांवर विविध रोगांचा आणि किडींचा प्रादुर्भाव वाढून शेतकरी यांचे नुकसान होणार आहे.अचानक पाऊस गायब झाल्याने ढगाळ वातावरण निवळून कडक ऊन पडत आहे, उष्णता निर्माण झाली आहे. दरम्यान, हवामानातील तापमान आणि दमटपणा वाढल्यामुळे नागरिकांना प्रचंड उकाडा जाणवत असून रोगराई वाढून आजारपणाला निमंत्रण मिळणार आहे. अचानक गायब झालेल्या पावसाने मनुष्याला सर्दी, खोकला, व्हायरल फिव्हर आणि इतर आजारांची लागण होण्याची शक्यता अधिक आहे.

## गर्भवती महिलेला दऱ्याखोऱ्यातून वाट काढत दवाखान्यात केले दाखल

**चौक :** खालापूर तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागात गर्भवती महिलेला झोळीचा आधार देऊन चौक येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.खालापूर तालुक्यातील माथेरान च्या पायथ्याशी ऊंबरणेवाडी ही आदिवासी वाडी आहे.येथील गर्भवती महिलेला झोळी करून दवाखान्यात दाखल करण्यात आले.

आजही आदिवासी समाजाची परवड सुरू असून सरकारने याची दखल घ्यावी अशी मागणी केली जात आहे.

खालापूर तालुक्यातील दुर्गम भागात असणाऱ्या ऊंबरणे वाडी येथील गर्भवती महिलेला झोळीचा वापर करून उपाचारा साठी दवाखान्यात आणले.हे भीषण वास्तव समोर आले आहे.रस्ता नसल्याने आजही गर्भवती स्त्रियांना,रुग्ण,विद्यार्थी, वयस्कर यांचे हाल होत आहेत. या गर्भवती महिलेच्या नशिबाने पाऊस नव्हता, अन्यथा खुप त्रास झाला असता.



## प्रा. योगिता कदम यांच्या साहित्य प्रवासाची सुरुवात; "मनातलं पानावर" कवितासंग्रहाचे प्रकाशन

**पेण : प्रतिनिधी**

प्राध्यापिका योगिता कदम लिखित "मनातलं पानावर" या पहिल्या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सुप्रसिद्ध लेखक देवा झिंजाड यांच्या हस्ते कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी वेलवेट कविशा पब्लिकेशनच्या संपादिका व प्रकाशिका वर्षा ठुकरूल प्रमुख उपस्थित होत्या तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, साहित्यप्रेमी, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




याप्रसंगी संवाद साधताना बोलताना प्राध्यापिका योगिता कदम म्हणाल्या, 'मनात साचलेल्या भावना, अनुभव आणि जीवनातील विविध प्रसंगांना कवितेच्या रूपात मांडण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. वाचकांनी या कवितांना आपलेसे करावे हीच माझी अपेक्षा आहे सारे सांगितले.

'मनातल पानावर' हा प्राध्यापिका योगिता कदम यांचा पहिलाच कवितासंग्रह असून, त्यामधील कविता मानवी भावना, नाती, स्त्रीमन, जीवनातील सघर्ष, आनद, वेदना आणि आशावाद यांचे संवेदनशील चित्रण करतात. सहज, ओघवत्या आणि मनाला स्पर्श करणाऱ्या शब्दांत व्यक्त झालेल्या या कविता प्रत्येक वाचकाला स्वतःच्या आयुष्याशी जोडून ठेवतात.

# एनएमएमटीच्या ताफ्यात ५१ सीएनजी बसेस

## पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

आठ वर्षांनंतर नवी मुंबई महानगरपालिका परिवहन (एनएमएमटी) उपक्रमाच्या ताफ्याच्या नूतनीकरणाला सुरुवात झाली असून, पहिल्या टप्प्यात ५१ सीएनजी बस शनिवारी प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्या. घणसोली आगारात राज्याचे वने मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते या बसचा शुभारंभ करण्यात आला.



वर्षभरात टप्प्याटप्प्याने एकूण १५० सीएनजी बस ताफ्यात समाविष्ट करण्याचे नियोजन असून, त्यामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.गेल्या आठ वर्षांत एनएमएमटीच्या ताफ्यात नवीन बस दाखल झाल्या नव्हत्या. दरम्यान, जुन्या डिझेल वाहनांचा वापर कमी होत गेल्याने अनेक मार्गांवरील फेऱ्यांवर परिणाम झाला होता. नवी मुंबईचा विस्तार, वाढती प्रवासी संख्या तसेच मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उरण आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसराशी वाढणारी दळणवळणाची गरज लक्षात घेऊन परिवहन सेवेचे आधुनिकीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या सीएनजी बसेसमुळे प्रमुख मार्गांवरील फेऱ्यांची संख्या वाढून प्रवाशांचा प्रतीक्षाकाल कमी होण्याबरोबरच प्रदूषणमुक्त सार्वजनिक वाहतुकीलाही चालना मिळणार आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना गणेश नाईक यांनी नागरिकांना दर्जेदार, विश्वासार्ह आणि परवडणारी परिवहन सेवा उपलब्ध करून देणे हे महापालिकेचे प्राधान्य असल्याचे सांगितले. परिवहन उपक्रम आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण करण्यावर भर दिला जाईल. वाशी बस आगाराच्या धर्तीवर अन्य आगारांतील उपलब्ध जागेचा व्यावसायिक वापर करून व्यापारी संकुले, हॉटेल आणि अन्य सुविधा विकसित करण्याचा विचार आहे. या माध्यमातून मिळणाऱ्या महसुलाचा उपयोग परिवहन सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आणि प्रवाशांना योग्य दरात सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

परिवहन उपक्रमाच्या उत्पन्न-खर्चाचा सर्वंकष आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील. वाहनांच्या देखभाल-दुरुस्तीत गुणवत्ता आणि पारदर्शकतेला प्राधान्य दिले जाईल. चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांनी प्रवाशांशी सेवाभावी दृष्टिकोनातून वागावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

या कार्यक्रमास महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, परिवहन समितीचे सभापती विकास झंजाड, परिवहन व्यवस्थापक उमाकांत जंगले, महापालिकेचे पदाधिकारी, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# ऐरोलीतील 'एसआयआर' घोटाळ्याचे आरोप बिनबुडाचे

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीच्या 'एसआयआर' मॅपिंग प्रक्रियेत बोगस नावे लपवली जात असल्याचा आरोप पूर्णपणे तथ्यहीन व दिशाभूल करणारा असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीचे खंडन करत, मतदार नोंदणी अधिकारी प्रीती पाटील यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर केला आहे.

तक्रारदार नगरसेवक शिवराम पाटील यांनी कोपरखैरणे येथील मतदार यादी भाग क्र. २९० आणि २९२ बाबत आक्षेप घेतले होते. यावर निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पडताळणी

### मतदार नोंदणी अधिकाऱ्यांचा खुलासा



केली असता, संबंधित सर्व मतदार मूळ जागेवरच वास्तव्यास असल्याचे आढळून आले आहे. नगरसेवकांच्या शंकांचे मनपा मुख्यालयातच निरसन करण्यात आले होते, तसेच त्यांनी कोणतीही लेखी तक्रार दिलेली नाही. १०% मॅपिंग बेकायदेशीरपणे ५०% पर्यंत वाढवल्याचा आणि बीएलओने चुकीचे मॅपिंग केल्याचा आरोपही बीएलओच्या खुलाशावरून चुकीचा ठरला आहे.

डिजिटल डेटा छेडछाडीचा आरोप फेटाळताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा डेटा संपूर्णपणे भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत असून त्याचा ॲक्सेस स्थानिक पातळीवर उपलब्धच नाही. सद्यस्थितीत सुरू असलेल्या प्री-एसआयआर प्रक्रियेत केवळ २००२ च्या मतदार यादीतील तपशिलांची पडताळणी व जुळवणी केली जात आहे. या प्रक्रियेचा प्रारूप मतदार आराखडा ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध होईल, ज्यावर ५ सप्टेंबरपर्यंत हरकती घेता येतील. त्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम यादी प्रसिद्ध होणार असल्याने, या स्तरावर बोगस किंवा दुबार नावे समाविष्ट होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# विद्यार्थी, पालक, शिक्षकांसाठी अपोलो हॉस्पिटलकडून सीपीआर प्रशिक्षण

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, वाशी येथे अपोलो हॉस्पिटल यांच्या सहकार्याने विद्यार्थी, पालक व शिक्षकांसाठी सीपीआर (Cardiopulmonary Resuscitation) या विषयावरील विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले.



या प्रशिक्षणामध्ये अपोलो हॉस्पिटलच्या तज्ज्ञांनी हृदयविकाराचा झटका, श्वासोच्छवास बंद होणे किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीत तातडीने कशी मदत करावी याविषयी मार्गदर्शन केले. तसेच सीपीआर देण्याची योग्य पद्धत, छातीवर दाब देण्याचे तंत्र, आपत्कालीन सेवांशी संपर्क साधण्याची प्रक्रिया आणि ऑटोमेटेड एक्स्टर्नल डिफिब्रिलेटर (AED) चा वापर याचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले.

विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी या प्रशिक्षणात उत्स्फूर्त सहभाग घेत प्रत्यक्ष सराव केला. या प्रशिक्षणामुळे आपत्कालीन परिस्थितीत योग्य वेळी प्रथमोपचार देण्याबाबत आत्मविश्वास निर्माण झाला तसेच जीवनरक्षक कौशल्यांचे महत्त्व सर्वांना समजले.शाळेच्या वतीने अपोलो हॉस्पिटलच्या तज्ज्ञांचे आभार मानण्यात आले.

# शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास, खरिप २०२६ पंतप्रधान पीक विमा योजनेचा लाभ उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन उरण तालुका कृषी विभागामार्फत उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी केले आहे.



शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी प्रधान मंत्री पीक विमा योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणीची रोपे उगवणी न होणे तसेच पूर ,दुष्काळ, पावसात खंड यामुळे होणारे नुकसान तसेच गारपिट, भूस्खलन क्षेत्र, जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान, काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरीता विमा संरक्षण लाभणार आहे.

रायगड जिल्ह्यात खरीप पिकांचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण व्हावे यासाठी इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे प्रधानमंत्री पिक विमा योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत हंगामातील पिकांसाठी विमा योजना राबविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या योजनेनुसार शेतकऱ्यांना केवळ ६५० रुपये प्रति हेक्टरी विमा हप्ता भरून पिक विमा उतरविता येणार आहे. व विमा संरक्षित रक्कम हेक्टरी ६५ हजार रुपये आहे.

यासाठी फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक पासबुक ,अद्यावत सातबारा, ८ अ उतारा, पेरणी स्वयंघोषणापत्र, ई पीक पाहणी तसेच सयुक्त खातेदारांसाठी सामूहिक संमती पत्र अशी आवश्यक कागदपत्रे आवश्यक आहेत. फार्मर आयडी ॲग्री स्ट्रिक क्रमांक नसल्यास योजनेचा लाभ मिळणार नाही. ई पीक पाहणी द्वारे नोंदविलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना ई पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंदणी करावी लागणार आहे.

# संदीप राक्षे यांना लोकराजा शाहू कर्तृत्वभूषण पुरस्कार



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सामाजिक कार्यकर्ते, लेखक तथा पर्यावरणप्रेमी संदीप राक्षे यांना सामाजिक कार्य, साहित्य, कला, वृक्षसंवर्धन, पर्यटन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'लोकराजा शाहू कर्तृत्वभूषण पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार कोल्हापूर येथील नष्टे लॉन्स येथे आयोजित भव्य समारंभात भारताचे सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीचे मुख्य अधिकारी डॉ. प्रसाद संकपाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे आयोजन पोलीस मित्र असोसिएशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने युवराज मोरे व रजनी शिंदे यांनी केले होते.

या सन्मानामुळे संदीप राक्षे यांच्या विविध सामाजिक व साहित्यिक कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली असून, त्यांच्या कार्याबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या पुरस्कारामागील प्रेरणा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक न्याय, समता, शिक्षणाचा प्रसार आणि सर्वसमावेशक समाजनिर्मितीच्या विचारांतून घेतली आहे. त्यामुळे हा पुरस्कार केवळ माझाच सन्मान नसून, समाजासाठी केलेल्या निःस्वार्थ कार्याची सार्वजनिक पावती आहे असे मत संदीप राक्षे यांनी व्यक्त केले.

# फुंडे विद्यालयात किशोरवयीन विद्यार्थिनींना मार्गदर्शन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर विद्यालय फुंडे या शाखेत श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था तसेच श्री लक्ष्मी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयातील इयत्ता आठवी ते दहावीच्या किशोरवयीन विद्यार्थिनींना मासिक पाळी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले,या दरम्यान येणाऱ्या विविध समस्या व त्या दूर करण्यासाठीचे उपाय सांगितले,या वेळी १३५ विद्यार्थिनींना सॅनिटरी नॅपकिन चे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमा दरम्यान श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्थेच्या अध्यक्ष संगीता सचिन ढेरे , संस्थेच्या सचिव कविता राकेश म्हात्रे,मीनाक्षी कोळी , तसेच श्री लक्ष्मी फाउंडेशनच्या अध्यक्षा रजनी ताजणे,हृदया मॅडम , चौधरी सर इत्यादी सदस्य उपस्थित होते. यावेळी हृदया मॅडम यांनी मुलींना मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया असून या मध्ये कोणत्याही प्रकारचा संकोच न पाळता आपण स्वतःची काळजी घेणे तसेच संतुलित आहार,योग्य व्यायाम, स्वच्छता यांचे महत्त्व याविषयी अतिशय उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. तसेच सॅनिटरी नॅपकिन चा वापर व त्याची योग्य विल्हेवाट या विषयी देखील विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी विद्यार्थिनींना दोन्ही संस्थां मार्फत सॅनिटरी नॅपकिन चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एस. डी.थोरात , पर्यवेक्षिका एस. एस.पाटील तसेच विद्यालयातील सर्व शिक्षिका देखील उपस्थित राहुन कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यात आला. सांस्कृतिक विभाग व विद्यालयातील इतर सर्व सेवकांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी योगदान दिले.

# कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन येथे गुणगौरव कार्यक्रम उत्साहात



**उरण : रामप्रहर वृत्त**

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन येथे लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त शाळेतील हुशार मुलांचा गुणगौरव कार्यक्रम आणि वह्या वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या योगदानाबद्दल जुन्या आठवणी काढून उजाळा दिला. यावेळी सारडे गावातील ज्येष्ठ ए डी पाटील, अक्षय ठाकूर, प्राचार्य प्रमोद म्हात्रे, उपाध्यक्ष अनिल पाटील, व शेणी गावातील ग्रामपंचायत सदस्य संग्राम पाटील, शाळेच्या प्राध्यापिका अर्चना पाटील, शाळेचे शिक्षक पुरण पाटील, संजय म्हात्रे, परेश पाटील, माली सर आदी शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# शहरातील वृक्षांचे आरोग्य लेखापरीक्षण


### महापालिका आयुक्तांची तज्ज्ञांशी चर्चा झाल्यानंतर अंतिम निर्णय

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरामध्ये गेल्या पंधरवड्यात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळल्याच्या घटनांनंतर वृक्ष व्यवस्थापनाचा प्रश्न चर्चेत आला. या पार्श्वभूमीवर शहरातील झाडांचे 'हेल्थ ऑडिट' (आरोग्य लेखापरिक्षण) करण्यासंदर्भात महापालिकेने चाचपणी सुरू केली आहे. यासाठी पर्यावरण आणि वनस्पती तज्ज्ञांबरोबर महापालिका आयुक्तांची लवकरच बैठक होणार असून, त्यानंतर पुढील भूमिका निश्चित केली जाईल, अशी माहिती उद्यान विभागाच्या उपायुक्त स्मिता काळे यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना दिली.

गेल्या काही दिवसांतील मुसळधार पावसात शहरातील विविध भागांत झाडे उन्मळून पडल्याने वाहने आणि मालमत्तेचे नुकसान झाले. तसेच नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला. त्यानंतर महापालिकेने धोकादायक फांद्यांच्या छाटणीला वेग दिला असला, तरी वृक्ष व्यवस्थापन अधिक शास्त्रीय पद्धतीने करण्याची गरज यानिमित्ताने अधोरेखित झाली. याच पार्श्वभूमीवर वृक्ष आरोग्य लेखापरिक्षणाचा पर्याय पुढे आला.

प्रस्तावित वृक्ष आरोग्य लेखापरिक्षणामध्ये प्रत्येक झाडाची जीवनक्षमता, वाढ, खोड व फांद्यांची संरचनात्मक स्थिती, मुळांच्या संरक्षण क्षेत्राची अवस्था, रोग किंवा बुरशीचा प्रादुर्भाव, झाड कोसळण्याचा संभाव्य धोका, देखभाल आणि छाटणीची आवश्यकता, तसेच पर्यावरणीय व आर्थिक मूल्य अशा विविध निकषांवर माहिती संकलित करण्यात येईल. याशिवाय एकाच



प्रकारच्या झाडांची तुलना करून असामान्य किंवा धोकादायक झाडांची ओळख पटविणे, तसेच प्रत्येक झाडाचा डिजिटल अभिलेख तयार करण्याचाही विचार करण्यात येणार आहे.

मुंबई महापालिकेने अलीकडेच झाडांच्या पडझडीनंतर वृक्ष व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाधारित पद्धतींचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे. महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी आयआयटी मुंबई, मुंबई विद्यापीठ आणि वृक्षतज्ज्ञांच्या मदतीने झाडांच्या आरोग्याचे मूल्यमापन, मुळांवरील काँक्रीटीकरणाचा परिणाम आणि सुरक्षिततेचे निकष निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्याच धर्तीवर नवी मुंबई महापालिकाही 'हेल्थ ऑडिट'या संकल्पनेचा अभ्यास करत असल्याचे उद्यान विभागाने सांगितले.

मात्र, नवी मुंबईत वृक्ष आरोग्य लेखापरिक्षणाची अंमलबजावणी कशा स्वरूपात करायची, कोणत्या तज्ज्ञ संस्थांचा सहभाग असणार आणि त्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबायची, याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. पर्यावरण आणि वनस्पती तज्ज्ञांसोबत होणाऱ्या बैठकीत या सर्व बाबींवर चर्चा होणार असून, त्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल, असे उपायुक्त स्मिता काळे यांनी स्पष्ट केले.

# पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोनच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोनच्या इयत्ता पाचवीतील सहा विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद (MSCE), पुणे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी पाच विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. यामधून कुमार आर्य निलेश म्हात्रे यांची महाराष्ट्र शासनाच्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.



या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्थानिक स्कूल समिती व सल्लागार समितीचे अध्यक्ष रमाकांत गावंड, उपाध्यक्ष अनंत गावंड, मुकुंद गावंड, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष आणि स्कुल कमिटी सदस्य,अनंत नारायण गावंड आणि स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य मनोहर गावंड, विलास गावंड, यांच्या हस्ते कुमार आर्य निलेश म्हात्रे याचा तुळशीचे रोप व अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या निकिता गायकवाड, स्थानिक स्कूल समितीच्या शिक्षक प्रतिनिधी नम्रता पाटील ,कनिष्ठ लिपिक निर्जरा म्हात्रे उपस्थित होत्या.

सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करून त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त केला असून भविष्यातही अशाच प्रकारे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाला सर्वतोपरी सहकार्य!

## संस्थेच्या नव्या इमारत भूमिपूजनप्रसंगी खासदार तटकरेंची ग्वाही

**माणगाव : प्रतिनिधी**

निजामपूर परिसरात होऊ घातलेल्या दिल्ली–मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर साठी या भागात हजारो एकर जमीन संपादित झाल्याने भविष्यात मोठ्या प्रमाणावर येथे कारखानदारी उभी राहणार आहे. मात्र या कारखानदारीत पहिला हक्क हा येथील भूमिपुत्रांचाच असेल, यावर त्यांनी विशेष भर दिला. या कारखानदारी साठी कुशल व अकुशल कामगार, तंत्रज्ञ, इंजिनीअर, आर्किटेक्ट, चार्टर्ड अकाउंटंट घडवावे लागतील, जेणेकरून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. किमान कौशल्यावर आधारित व्यवसायाभिमुख शिक्षण सुरू केल्यास त्याचा लाभ आगामी पिढीला निश्चितच होईल, असे सांगत कोणत्या प्रकारचे कुशल



प्रशिक्षण वर्ग सुरू करता येतील, यासाठी संस्थेच्या सदस्या बरोबर चर्चा करूनच कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलली जातील, असे आश्वासन देत संस्थेच्या शैक्षणिक विस्तारासाठी सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाहीही खा. तटकरेंनी यावेळी दिली.

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भा. ग. कामेरकर प्राथमिक विद्यामंदिर आणि श्री. द. रा. पवार इंग्रजी माध्यम विभाग या शाळांच्या नव्या इमारतींच्या भूमिपूजनाचा सोहळा शनिवारी ता. ११ जुलै रोजी सकाळी ११ वा. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. राष्ट्रवादी काँ. पक्षाचे प्रांताध्यक्ष तथा भारतीय पेट्रोलियम व नॅचरल गॅस नियामक मंडळाचे चेअरमन खा. सुनील तटकरे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष दत्तूशेठ पवार होते. यावेळी माजी सदस्य रायगड जिल्हा नियोजन समिती बाबूशेठ खानविलकर, माजी उपाध्यक्ष रायगड जिल्हा युवक काँग्रेस अनंता महाडिक, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेडचे प्रतिनिधी, विश्वस्त कार्यवाह हमजाभाई जालगावकर, शाळा समितीचे अध्यक्ष दत्ताराम नाडकर, कार्यवाह दिगंबर जोशी तुकाराम सुतार, सुधीर पवार, शैलेश खांडस्कर, गणेश पवार, मिलिंद फोंडके, देविका पाबेकर, रहिमत परदेशी, जनार्दन सिलिमकर, शिवाजी घाग, यांच्यासह ग. रा. मेथा माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात पेण विधानसभा मतदारसंघ कार्याअध्यक्ष प्रमोद म्हसकर यांनी संस्थेला दोन संगणक आणि एक लॅपटॉप संच भेट देत डिजिटल शिक्षण उपक्रमाला चालना दिली असल्याचे तटकरे यांनी जाहीर केले.

## अंबा नदीच्या भीषण पुरामुळे जांभूळपाड्यात ग्रामपंचायत कार्यालयासह शासकीय इमारतींचे नुकसान

**पाली : प्रतिनिधी**

अंबा नदीला आलेल्या भीषण पुरामुळे जांभूळपाडा गावाने अभूतपूर्व संकटाचा सामना केला आहे. पुराच्या रौद्ररूपाने गावातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून १९८९ च्या महापुराच्या भयावह आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या आहेत. सध्या गावभर पाणी आणि चिखलाचे साम्राज्य पसरले असून प्राथमिक अंदाजानुसार कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे.

या महापुरात जांभूळपाडा ग्रामपंचायत कार्यालयाला सर्वाधिक फटका बसला आहे. पुराचे पाणी थेट ग्रामपंचायत कार्यालयात घुसल्याने संपूर्ण कार्यालय चिखलमय झाले आहे. महत्त्वाची कागदपत्रे, प्रशासकीय अभिलेख आणि शासकीय दप्तर पाण्यात भिजल्याने कार्यालयीन कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे. कार्यालयातील सीसीटीव्ही यंत्रणेचे मोठे नुकसान झाले असून,



ग्रामपंचायत कार्यालयाच्या सुरक्षेसाठी उभारलेली मुख्य संरक्षक भिंत आणि पेव्हर ब्लॉक बसवलेला परिसर पुराच्या प्रचंड प्रवाहात कोसळून वाहून गेला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, कार्यालयीन कामकाज पुन्हा सुरळीत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर दुरुस्तीची आवश्यकता निर्माण झाली आहे.ग्रामपंचायत कार्यालयासोबतच पुराच्या तडाख्यात रायगड जिल्हा परिषद शाळा, स्थानिक अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि पशुवैद्यकीय दवाखाना या शासकीय इमारतींचेही मोठे नुकसान झाले आहे.

या सर्व ठिकाणी पूर आलेले पाणी शिरल्याने शैक्षणिक साहित्य,औषधसाठा, फर्निचर, खुर्च्या आणि इतर शासकीय मालमत्ता पूर्णपणे खराब झाली आहे.

याशिवाय, गावातील अनेक चारचाकी आणि दुचाकी वाहने पुराच्या पाण्यात अडकली, तर अनेक दुचाकी वाहून गेल्याच्या दुर्दैवी घटना घडल्या आहेत. अनेक नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरल्याने अन्नधान्य आणि संसारोपयोगी वस्तूंचे अतोनात नुकसान झाले आहे. या पुरामुळे परिसरातील शेती, पाळीव जनावरे, रस्ते आणि सार्वजनिक सुविधांनाही मोठा फटका बसला आहे.

## विवा कॉलेज येथे वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, चित्रकला व निबंध स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील नामांकित शिक्षण संस्थांपैकी एक ओळखल्या जाणाऱ्याप्रोफेशनल एज्युकेशन सोसायटी संचलित विवा कॉलेज, माणगाव येथे चेअरमन विनया ढेपे यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ११ जुलै रोजी वृक्षारोपण कार्यक्रम, स्वच्छता अभियान, चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमांत



सहभाग घेतला. वृक्षारोपणाद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला, तर स्वच्छता अभियानातून स्वच्छ परिसर आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यात आली.चित्रकला व निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, स्वच्छता, सामाजिक मूल्ये आणि राष्ट्रप्रेम या विषयांवर आकर्षक कलाकृती व विचार मांडले.

# सुधागड तालुक्यात धक्कादायक घटना

## रामनगर येथे विहिरीत बुडून २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून रामवाडी येथील २१ वर्षीय तरुणाचा विहिरीत बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. विघ्नेश सुरेश तेलंगे (वय २१, रा. रामनगर ) असे मृत तरुणाचे नाव आहे.



सुधागड तालुक्यातील रासळ ग्रामपंचायत हद्दीतील रामवाडी येथे ही दुर्दैवी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, विघ्नेश तेलंगे हा आपल्या चार मित्रांसोबत परिसरातील एका विहिरीजवळ गेला होता. विहिरीतील खोल पाण्यामुळे तो बुडाला असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. मात्र विहिरीची खोली अधिक असल्याने आणि पाणी गढूळ असल्याने शोधकार्य करण्यात अडचणी येत होत्या. यानंतर पाली पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. विहिरीतील पाण्याचा मोठा साठा आणि कमी दृश्यमानता लक्षात घेता कोलाड येथील विशेष रेस्क्यू टीमला पाचारण करण्यात आले. रेस्क्यू पथकाने युद्धपातळीवर शोधमोहीम राबवत अनेक तास प्रयत्न केल्यानंतर विघ्नेशचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढला.

# चंद्रकांत खोत यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चोरढे येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप; सोमजाई माता क्रीडा मंडळाचा उपक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील चोरढे येथे सोमजाई माता क्रीडा मंडळ, खरसई यांच्या वतीने संस्थापक तथा कामगार भूषण चंद्रकांत खोत यांच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत दोन शाळांमधील एकूण १४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

शुक्रवारी (दि. १० जुलै) सकाळी आयोजित कार्यक्रमात चंद्रकांत खोत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी महात्मा गांधी विद्यालय, चोरढेचे अध्यक्ष काशिनाथ तांबडे, राजिप शाळेचे अध्यक्ष



काशिनाथ पैर, खजिनदार पांडुरंग कांबळी, ग्रामसचिव राम मंदारे, माजी अध्यक्ष नरेश भातळकर, कार्यकर्ते हिराजी पाटील, क्रीडा प्रमुख लक्ष्मण पाटील, समाजसेवक यशवंत पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिल चोरढेकर, काशिनाथ कोकाटे, माजी विद्यार्थी दीपेश चोरढेकर, शंकर चोरढेकर, राजिप शाळेच्या मुख्याध्यापिका भगत मॅडम, महात्मा गांधी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका भिडे मॅडम, उपाध्यक्ष हरिश्चंद्र पाटील, खजिनदार राम भोपी, महेश डोलकर, आंबलीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात राजिप शाळा, चोरढे येथे इयत्ता पहिली ते सातवीमधील ७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका भगत मॅडम व शिक्षकवृंद यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

त्यानंतर दिनाभाई मोरे संचलित महात्मा गांधी विद्यालय, चोरढे येथे झालेल्या कार्यक्रमात इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या ७० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यालयाचे अध्यक्ष काशिनाथ तांबडे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे चंद्रकांत खोत व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना चंद्रकांत खोत यांनी शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच आमदार महेंद्र दळवी यांच्या विकासकामांचे कौतुक करत त्यांचा कार्यसम्राट आमदार म्हणून गौरव केला.

कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन ग्रामपंचायत सदस्य तथा महात्मा गांधी विद्यालयाचे संचालक अनिल चोरढेकर यांनी केले.

## माथेरानला एकच कर आकारणी खिडकीमुळे रांगा; वृद्ध, महिला व लहान मुलांचे हाल

**नेरळ : प्रतिनिधी**

विकेंड आणि सुट्टीच्या पार्श्वभूमीवर जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरानमध्ये पर्यटकांची मोठी गर्दी झाली. मात्र माथेरान नगरपालिकेच्या अपुऱ्या नियोजनाचा फटका पर्यटकांना बसला. दस्तुरी नाका येथील प्रवेशद्वारावर प्रवासी कर भरण्यासाठी केवळ एकच खिडकी सुरू असल्याने शेकडो पर्यटकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागले. परिणामी प्रवेशद्वारापासून वाहनतळापर्यंत सुमारे ५०० मीटर लांब रांग लागली होती.

हातात सामान घेऊन माथेरानमध्ये प्रवेश करण्यासाठी पर्यटकांना उन्हात व गर्दीत ताटकळत उभे राहावे लागले. या रांगेत वृद्ध, महिला, लहान मुले यांनाही मोठा त्रास सहन करावा लागला. तिकीट वितरणासाठी एकच खिडकी असल्याने प्रत्येक पर्यटकाला वेळ लागत होता आणि त्याचा परिणाम संपूर्ण प्रवेश व्यवस्थेवर झाला.


दुसरीकडे वाहनतळ पूर्ण क्षमतेने भरल्याने अनेक पर्यटकांनी आपली वाहने घाटरस्त्याच्या दुतर्फा उभी केली. त्यामुळे दस्तुरी नाका ते घाटमार्गावर सुमारे तीन किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. वाहतूक कोंडीमुळे अनेक पर्यटकांना



वाहने सोडून पायी माथेरानकडे जावे लागले, तर काहींनी अर्ध्यावरूनच परतीचा मार्ग स्वीकारला.

स्थानिकांच्या मते, विकेंडला माथेरानमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात, हे प्रशासनाला माहिती असतानाही अतिरिक्त कर आकारणी खिडकी सुरू करण्यात आली नाही. त्यामुळे दर आठवड्याला पर्यटकांना अशाच गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

. माथेरानसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटनस्थळी दर विकेंडला हीच परिस्थिती निर्माण होत असताना प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने पर्यटकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



**मुरुड : मुरुड पासून ५ किमी अंतरावर असलेल्या सावंतकडा धबधबा सलग पाऊसाने वाहू लागला आहे. पर्यटकांना नेहमीच आरशित करतो. उद्याच्या रविवारी गर्दी होणार ( छाया : सुधीर नाझरे)**

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटून समाजसेवक आनंदराव कचरे यांचा वाढदिवस साजरा

**चौक : प्रतिनिधी**

समाजसेवक आनंदराव कचरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जिल्हा परिषद शाळा गाढेश्वर वाजे पनवेल येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जपून वाढदिवस साजरा करण्यात आला.

समाजसेवक आनंदराव कचरे हे ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे काम करत त्यांच्या माध्यमातून समाजासाठी अहोरात्र मेहनत घेऊन काम करत आहेत, रायगड जिल्हात त्यांचे समाजासाठी महत्वाचे काम असून समाजातील गोर गरीब जनतेच्या अडीअडचणी जाणून घेऊन ते नेहमी मदतीला धावून जात असतात, त्यांनी आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून समाजात शिक्षणाची क्रांती घडविण्यासाठी ते प्रयत्न



करत असतात, तर राजामाता अहिल्यादेवी होळकर उत्सव समिती शेलू रायगडचे संस्थापक माजी अध्यक्ष तथा ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे कोकण संपर्क प्रमुख रामचंद्र आप्पा पुकळे यांनी त्यांची भेट घेत सन्मानचिन्ह भेट देऊन त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या,

यावेळी बाळासाहेब पुकळे ज्योतिर्लिंग सामाजिक बहुउदेशीय संस्थेचे संस्थापक तथा ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे कोकण संपर्क प्रमुख आदित्य वाघमोडे, ऑल इंडिया धनगर समाज मुंबई प्रदेश अध्यक्ष निवृत्त पोलीस, प्रल्हाद पुकळे, उपस्थित होते.

# अर्जेंटिना सेमीफायनलमध्ये

## स्वित्झर्लंडचा धुव्वा; शेवटच्या क्षणी फिरला सामना!



**मिसूरी : वृत्तसंस्था**

अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड यांच्यातील उपांत्यपूर्व फेरीचा सामना रविवारी पार पडला. या सामन्यात अर्जेंटिनाने स्वित्झर्लंडला ३–१ने पराभूत करून फिफा विश्वचषक २०२६ च्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. या विजयासह अर्जेंटिनाने फिफा विश्वचषकाच्या इतिहासात सहाव्यांदा उपांत्य फेरीत पोहोचण्याचा विक्रम केला आहे.

आता फिफा विश्वचषक २०२६ मध्ये १५ आणि १६ जुलै रोजी दोन महत्त्वाचे सामने होणार आहेत. पहिल्या सामन्यात स्पेनचा सामना फ्रान्सशी होईल, तर दुसऱ्या सामन्यात अर्जेंटिना स्वित्झर्लंडविरुद्ध लढेल. अर्जेंटिनाचा दिग्गज खेळाडू मेस्सीला या सामन्यात एकही गोल करता आले नाही तरी त्याने फुटबॉल विश्वात एक नवा इतिहास रचला आहे. या सामन्यात मेस्सीने १० व्या मिनिटाला अलेक्सिस मॅक अलिस्टरला असिस्ट देत फिफा विश्वचषकात नवा विक्रम रचला आहे. मेस्सीचा हा त्याच्या फिफा वर्ल्डकप करियरमधील १०वा असिस्ट होता.

### असा फिरला सामना

सामना १–१ने बरोबरीत सुटल्याने मॅच एक्स्ट्रा टाईममध्ये गेली. वर्ल्डकपमध्ये अर्जेंटिनाचा हा १३वा एक्स्ट्रा टाईम होता. दुसऱ्या हाफमध्ये बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या ज्यूलियन अल्वारेझने जोश लोपेझच्या पासवर गोल करत अर्जेंटिनाला २–१ अशी आघाडी दिली. हा गोल सामना फिरवणारा ठरला. सामना संपायला काही सेकंद असताना बदली खेळाडू मार्टिनेझने पेनल्टी एरियाबाहेरून उत्कृष्ट असा शॉट मारत तिसरा गोल केला आणि अर्जेंटिनाला विजय मिळवून दिला.

# लिंडा नोस्कोवा विम्बल्डन विजेती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दुसऱ्या सेटमध्ये तब्बल पाच चॅम्पियन्सशिप पॉइंट्स गमावणाऱ्या लिंडा नोस्कोवाने आपल्याच चेक प्रजासत्ताक संघाच्या कॅरोलिना मुचोवाचा ६–२, ५–७, ६–३ असा पराभव केला आणि विम्बल्डन महिला विजेतेपद मिळवले. २०२४ मधील पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत एकत्रितपणे खेळताना आपल्या देशाला सुवर्णपदक जिंकून देणाऱ्या लिंडा आणि कॅरोलिना यांच्यातील विम्बल्डन महिला एकेरीचा हा सामना कमालीचा चढउताराचा ठरला.





लिंडाने पहिला सेट ६–२ असा जिंकला आणि दुसऱ्या सेटमध्ये ५–२ अशी आघाडी घेतली, तेव्हा हा सामना एकतर्फी होणार असे चित्र होते; परंतु आपल्या मैत्रीणीचा खेळ जाणणाऱ्या कॅरोलिनाने हार मानली नाही. दुसरा सेट ७–५ असा जिंकून सामन्यात रंग भरले. तिसऱ्या सेटमध्ये मात्र तिला आपल्या लढवय्या खेळात सातत्य राखता आले नाही. या वेळी मिळालेली संधी लिंडाने गमावली नाही आणि विम्बल्डनची नवी सम्राज्ञी होण्याचा मान मिळवला. २१ वर्षीय आणि नववे मानांकन असलेली लिंडा नोस्कोवा २०११ नंतरची सर्वात तरुण विजेती ठरली.

# इंग्लंडकडून भारताला ४–०ने व्हाईटवॉश

## शेवटच्या सामन्यातही ५६ धावांनी पराभव

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाने आयर्लंडपाठोपाठ इंग्लंडविरोधातील मालिकाही गमावली आहे. इंग्लंडने भारतीय गोलंदाजांचा घाम काढत टी–२० इतिहासातील भारताविरोधात सर्वोच्च धावसंख्या उभारली. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघ अपयशी ठरला.

भारत आणि इंग्लंडमध्ये झालेल्या पाचव्या आणि अखेरच्या टी–२० सामन्यामध्येही भारताचा ५६ धावांनी पराभव झाला आहे. इंग्लंडने भारत विरुद्ध टी–२० मध्ये भारताविरुद्ध सर्वात मोठी धावसंख्या २५७–३ उभारली होती. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघ २० ओव्हरमध्ये २०१–८ धावा करू शकला. या मालिकेमध्ये भारताला एकही सामना जिंकला आला नाही.

इंग्लंडकडून जोस बटलर १३१ धावा आणि हॅरी ब्रूक नाबाद ९६ धावा करताना टी–२० मधील दुसरी सर्वात मोठी २३३ धावांची विक्रमी भागीदारी करत भारताला बॅकफूटवर ढकलले. भारताकडून ईशान किशनने सर्वाधिक ५६ धावा आणि तिलक वर्माच्या ५३ धावांनी आशा वाढली होती पण भारत विजय मिळवू शकला नाही. भारताने इतिहासात पहिल्यांदाच तीनपेक्षा जास्त सामन्यांच्या




मालिकेत एकही सामना जिंकला नाही. आयर्लंडपाठोपाठ इंग्लंडचीही मालिका गमावल्याने श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात भारताची विजयाची पाटी कोरीच राहिली.

दरम्यान, श्रेयस अय्यर याने टॉस जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, मात्र हा निर्णय पूर्णपणे चुकीचा ठरवत इंग्लंड संघाने भारतीय गोलंदाजांचा घाम काढला. दुसऱ्या ओव्हरमध्ये प्रसिद्ध कृष्णाने फिलिप सॉल्ट याला सहा धावांवर आऊट करत पहिली विकेट आपल्या नावावर केली होती, मात्र त्यानंतर आलेल्या कॅप्टन हॅरी ब्रूक आणि जोस बटलरने १०२ चेंडूंत २३३ धावांची विक्रमी पार्टनरशिप करत संपूर्ण मॅच इंग्लंडच्या पारड्यात झुकवली होती. जोस बटलर याने ६४ सामन्यांत १३१ धावा करताना १२ चौकार आणि आठ षटकार लगावले होते, तर ब्रुकने ४५ चेंडूंत नाबाद ९५ धावा करताना चार चौकार आणि आठ षटकारांची आतषबाजी केली.

# आफ्रिकन खेळाडू जेडेन ॲडम्सचे निधन

**केप टाऊन : वृत्तसंस्था**

सध्या सुरू असलेल्या फुटबॉल विश्वकरंडक स्पर्धेत दक्षिण आफ्रिका संघातून खेळलेला २५ वर्षीय युवा खेळाडू जेडेन ॲडम्स याचे आकस्मिक निधन झाले. ए गटात समावेश असलेल्या दक्षिण आफ्रिका संघाच्या तिन्ही साखळी सामन्यात ॲडम्स खेळला होता.



आफ्रिका संघाने बाद फेरीत प्रवेश केला होता; परंतु राऊंड ऑफ ३२ मध्ये त्यांचा सहयजमान कॅनडाविरुद्ध पराभव झाला.

जेडेन ॲडम्सचे निधन झाले हे वृत्त आमच्यासाठी धक्कादायक आहे, असे मत दक्षिण आफ्रिकेचे क्रीडा आणि सांस्कृतिक मंत्री गेटॉन मॅकेन्झी यांनी व्यक्त केले. दक्षिण आफ्रिकेने एक तरुण आणि उमदा खेळाडू गमावला असल्याचीही भावना त्यांनी व्यक्त केली. केप टाऊन शहराच्या उपनगरातील स्कॉटिशलूफ येथील निवासस्थानी जेडेन मृतावस्थेत आढळला. पोलिसांनी त्याच्या मृत्यूची चौकशी सुरू केली आहे.

त्याच्या निधनाचे निश्चित कारण अजून स्पष्ट झालेले नाही, असे मॅकेन्सी यांनी स्पष्ट केले. विश्वकरंडक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा चेक प्रजासत्ताकविरुद्धचा सलामीचा १–१ अशा बरोबरीत सुटला. या लढतीत जेडेन ॲडम्स खेळला; परंतु सामना सुरू होण्याच्या एक तास अगोदर आफ्रिकेतील त्याच्या घरी आजीचे निधन झाले होते.

# एमसीए पंच चाचणीत रायगडचे यश

## खालापूरचे प्रवीण देशमुख यांची निवड

**खालापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या पंच चाचणी परीक्षेत रायगड जिल्ह्याने बाजी मारली आहे. जून २०२६ मध्ये झालेल्या या परीक्षेत जिल्ह्यातील ११ पंचांनी ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवत मुख्य परीक्षेसाठी पात्रता मिळवली. यामध्ये खालापूर तालुक्यातील सजगावचे प्रवीण देशमुख यांनी एमसीएच्या स्टेट पॅनलवर स्थान पटकावले असून त्यांच्या या यशामुळे रायगडच्या क्रिकेट वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने जून २०२६ मध्ये पंच चाचणी परीक्षा आयोजित केली होती. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. त्यात रायगड जिल्ह्यातील ११ पंचांनी घवघवीत यश मिळवले. ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून हे सर्व पंच आता मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. यातील विशेष बाब म्हणजे खालापूर तालुक्यातील सजगाव येथील प्रवीण देशमुख यांनी उत्कृष्ट कामगिरी करत एमसीएच्या मुख्य पंचांच्या पॅनेलवर आपले स्थान निश्चित केले आहे. त्यांच्या या महत्त्वपूर्ण यशाबद्दल स्थानिक क्रीडाप्रेमी, जिल्हा क्रिकेट असोसिएशन तसेच मित्रपरिवारांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या पुढाकारातून जिल्ह्यातील इच्छुक पंचांसाठी जून २०२६पासून १०५ दिवसांचे मार्गदर्शन शिबिर आयोजिण्यात आले होते. शिबिराचा फायदा जिल्ह्यातील पंचांना झाला. शिबिरात मुख्य प्रशिक्षक आणि क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा यांच्यासह बीसीसीआयचे पंच हर्षद रावले आणि रुपेश खडगी तसेच एमसीए मुंबईचे पंच राजन कसबे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. यामुळे ग्रामीण भागातील प्रतिभावान खेळाडू आणि पंचांना मोठे व्यासपीठ मिळण्यास मदत होणार आहे.

# महाराष्ट्र राज्य कबड्डी दिनी अभिजित राणे, हिरामण भोईर यांना पुरस्कार जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**





महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने १५ जुलै हा कबड्डी महर्षी स्व. शंकरराव (बुवा) साळवी यांचा जन्मदिवस कबड्डी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावेळी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात येतो.

या कबड्डी दिनी रायगडच्या अभिजित राणे, क्रीडा कार्यकर्ते आवास ता. अलिबाग यांना "कृतज्ञता" पुरस्कार तसेच पेणच्या पिंपळपाडा येथील राष्ट्रीय कबड्डी पंच हिरामण भोईर यांना राज्य कबड्डी असोसिएशनतर्फे पुरस्कार जाहीर झाले. १५ जुलैला रत्नागिरीत होणाऱ्या कबड्डी दिन कार्यक्रमात दोघांना अमृत कलश देऊन गौरवण्यात येणार आहे.

# टी-२० संपली! आता वनडेचा थरार

## पहिल्यांदाच विराट-रोहित एकत्र मैदानात



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील टी–२० मालिका आता संपली आहे. या मालिकेत टीम इंडियाला ०–४ अशा दारूण पराभवाचा सामना करावा लागला, मात्र आता या पराभवाला मागे सारत दोन्ही संघ तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी आमनेसामने येणार आहेत. या मालिकेत दिग्गज फलंदाज रोहित शर्मा आणि विराट कोहली पुन्हा एकदा मैदानात ॲक्शनमध्ये दिसणार आहेत. विराट आणि रोहितला खेळताना पाहणे प्रत्येक क्रिकेट चाहत्यासाठी खास असते. कारण हे दोन्ही खेळाडू आता प्रामुख्याने वनडे फॉरमॅटमध्येच खेळताना दिसतात.

भारतीय संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे, जिथे दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची टी–२० मालिका खेळवली गेली.

### वनडे मालिकेचे वेळापत्रक

**१४ जुलै – पहिला वनडे**
– दुपारी ३:३० वा. बर्मिंगहॅम

**१६ जुलै – दुसरा वनडे**
– संध्याकाळी ५:३० वा. कार्डिफ

**१९ जुलै – तिसरा वनडे**
– दुपारी ३:३० वा. लॉर्ड्स (लंडन)


**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर शिवाजीनगर**

**वर्ष २३ वे** || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || **स्थापना २००३**

# पुण्यतिथी सोहळा



श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी
श्री. चांगू काना ठाकूर



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी
श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०२, शके १९४८, गुरुवार दिनांक १६/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०३, विनायकी चतुर्थी, शके १९४८, शुक्रवार दिनांक १७/०७/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## कार्यक्रम

| गुरुवार, दिनांक १६/०७/२०२६ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर<br>पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), श्री. भागवत साहेब (पुणे), ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण),श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्यंभर भजन मंडळ, गव्हाण, गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण – कोपर, गायीका : श्रीमती. हिराबाई घरत,<br>सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत,<br>श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ – कोपर, गायीका : सौ. सुप्रिया घरत<br>वादक : तुषार घरत, टाळकरी – सौ. शितल घरत, कोपर |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर, गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>श्री. हर्षल फडके, पखवाज : श्री. पवन फडके |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | एकनाथी भागवत ग्रंथ वाचन / ध्यान |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ (कोपर), बुवा : श्री. वसंतशेठ पाटील (कोपर)<br>पखवाज : वैष्णव देशमुख |
| सायं. ०९.०० ते ११.०० कीर्तन | **प्रभोदनकार :** ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे,<br>श्री क्षेत्र पाटणोली (पनवेल), वादक : ह.भ.प. आदित्य पाटील,<br>गायक : ह.भ.प. कल्पेश पाटील, अदित्य पाटील, विनायक पाटील |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन–सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

| शुक्रवार, दिनांक १७/०७/२०२६ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर–रांजणपाडा) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा),<br>पखवाज : निलेश पाटील (कोपरा) |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

**✻ कार्यक्रमाचे ठिकाण ✻**
**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर**
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

**✻ व्यवस्थापक ✻**
**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)**
**शिवाजीनगर- गव्हाण- न्हावे- न्हावेखाडी- कोपर (संचलित)**

**✻ संयोजक ✻**
**श्री. रामशेठ ठाकूर** (माजी खासदार)
**आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com